


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क्र.

# ज्ञान युगाचे जनक आचार्य प्रफुल्लचंद्र राय

## वि. स. गवाणकर



IRBK-0106236
IRBK-0106236



विज्ञान युगाचे जनक : पुष्प २ रें

५१०७०
६२३६

# आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

: लेखक :

वि. स. गवाणकर

IRBK-0106236

IRBK-0106236

मूल्य बारा आणे

प्रकाशक:
न. शं. कुलकर्णी,
एस्.टी.सी., टी.डी.
दि टीचर्स आयडियल
पब्लिशिंग हाउस लि.
पुणें २ करितां.

मुद्रक:
न. शं. कुलकर्णी
एस्.टी.सी., टी.डी.
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
७७ शनवार पेठ,
पुणें २ करितां

● ● ●

* हें पुस्तक मुलांसाठींच आहे.
* लेखकाचें नवीन असें कांहीं नाहीं.
* फक्त भाषा व मांडणी लेखकाची.
* मुलांच्या दृष्टीनें महत्त्वाचा एवढाच मजकूर. पाल्हाळ नाहीं.

● ● ●

प्रथमावृत्ति सन १९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

माझे वडील बंधु

**कै. राजाराम सखाराम गवाणकर**

यांच्या पूज्य स्मृतीस भक्तिप्रेमानें

**समर्पण**

२५५५८
१७८
२८।३।५९

## भारतमाता भाग्याची

भारतमाता थोर भाग्याची, कीं जिच्या पुत्रांनीं आपल्या बुद्धीच्या जोरावर जगांत कीर्ति मिळविली. वाल्मीकीनें रामायण लिहिलें, व्यासानें भारत लिहिलें, कालिदासानें शाकुंतल रचिलें, ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी लिहिली, रवींद्रनाथ टागोरांनीं गीतांजलि रचिली, लो. टिळकांनीं गीतारहस्य सांगितलें, आणि आपल्या प्रिय भारतमातेच्या कीर्तींत भर घातली. तसेंच महात्मा गांधींनीं अहिंसेचा मार्ग दाखविला. जगदीशचंद्र बोस, रामन्, प्रफुल्लचंद्र रॉय यांनीं शास्त्रीय संशोधन व नवेनवे शोध लावून आपल्या भारतमातेच्या कीर्तींत आणखी बहुमोल भर घातली. आपणालाहि आपल्या शक्तीनुसार प्रयत्न करून आपल्या भारतमातेला अधिक कीर्तिवान् करावयाची आहे. त्याकरितां आपणापुढें भारतमातेच्या या पुत्रांचा आदर्श पाहिजे—या थोर लोकांची ओळख पाहिजे. त्यांचें जीवन माहीत असलें पाहिजे. म्हणूनच भारतमातेच्या थोर पुत्रांपैकीं 'आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय' यांची ओळख आतां आपण करून घेऊं या.

## सुगंधी वातावरण

प्रफुल्लचंद्राचा जन्म इ. स. १८६१ सालीं बंगालमध्यें झाला. त्याचें सबंध नांव प्रफुल्लचंद्र हरीशचंद्र रॉय. कुटुंब खानदानी. कशाचीच ददात नाहीं. नोकरचाकर घरांत राबताहेत. पाहुण्यांची ये-जा चालू आहे. पैशा-अडक्याला वाण नाहीं. हंगामाच्या दिवसांत भातानें भरलेल्या गाड्या कुळें आणून हरीशबाबूंच्या दारा-पुढील अंगणांत ओतीत आहेत, आणि अजिजीनें म्हणत आहेत, 'बाबूजी, आज हें देतों आहोंत, परत लागेल तेव्हां मागायला येणार हं!'

'केव्हांहि या. हें सारें तुमचें आहे', असें हरीशबाबू हसून सांगत आहेत.

असा देखावा हंगामाच्या दिवसांत हरीशबाबूकडे दिसावयाचा.

## गरिबांस मदत

हरीशबाबू बंगालमधील बडे जमीनदार. पण ते इतर जमीनदारांच्या वृत्तीचे नव्हते. बंगालमधील जमीनदार आपल्या कुळांना या ना त्या प्रकारें जांचीत असत—छळीत असत. वेळींप्रसंगीं चाबकाच्या फट-काऱ्यांनींहि आपली हक्कदारी पुरेपूर वसूल करीत असत. पण हरीशबाबू या वृत्तीचे नव्हते. आपण तसाच दुसरा ही वृत्ति ते सतत मनांत बाळगून वागत. ईश्वरी कृपेनें आपणांला जें कांहीं मिळतें, त्यांत कांहीं वांटा इतरांचाहि आहे, असें त्यांना वाटे. नुसतें वाटतच

असे, असें नव्हे तर तसें त्यांच्या आचरणांतहि असें. आपल्या मिळकतीचा बराच भाग ते गोरगरिबांसाठीं खर्च करीतच; पण वेळप्रसंगीं कर्ज काढूनहि गरिबांचे संसार सावरून धरीत, त्यामुळें हरीशबाबू कर्ज-बाजारीहि झाले, पण त्याची त्यांनीं पर्वा केली नाहीं. परोपकारी माणसाला वाटतें, 'हें विश्वची माझें घर' त्याला स्वतःच्या संसाराची काळजी क्वचितच असते. गरिबांचे संसार सुरळीत कसे चालतील, त्यांच्या जठराग्नींत सकाळ-संध्याकाळ अन्नाचे दोन घास कसे पडतील, याचीच काळजी त्याला अधिक असते. हरीशबाबूंची ही वृत्ति होतीच.

## देशप्रेम

शिवाय आणखी एक वृत्ति त्यांच्या ठिकाणीं होती, ती म्हणजे देशाबद्दलचें अलोट प्रेम. आपला भारत स्वतंत्र कसा होईल, सुखी कसा होईल याची त्यांना सतत तळमळ लागलेली असे. त्याकरितां ते मागेंपुढें न पाहतां तन-मन-धन खर्च करीत. गृहस्थ इंग्रजी, फारशी भाषा चांगलाच शिकलेला. पट्टीचा विद्वान्. शिवाय घरच्या लायब्ररींत विविध विषयांचीं हजारों पुस्तकें. इंग्रजांच्या रीतिरिवाजांची अतिशय आवड. त्यांच्या वाङ्मयाचीहि गोडी. पण भारतांतील इंग्रजी सत्तेबद्दल मात्र अत्यंत तिटकारा. त्यांना वाटे आपला भारत स्वतंत्र करण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांपैकीं लोक सुशिक्षित होणें, हा एक मार्ग आहे. आपण हा मार्गच स्वीकारला पाहिजे.

## शिक्षण

लोकशिक्षणाकरितां हरीशबाबूंनीं आपल्याच घरांत एक शाळा सुरू केली. या शाळेंतच लहानगा प्रफुल्लचंद्र अभ्यासासाठीं बसूं लागला.

लहानग्या प्रफुल्लचंद्रास घरांतच शाळा आणि वडिलांच्या देखरेखीखालीं शिक्षण. योग फार चांगला जमून आला. प्रफुल्लचंद्र जात्याच हुषार. शिवाय वडिलांच्या शिस्तबाज वागणुकीचें डोळ्यांसमोर उदाहरण; त्यामुळें इतक्या लहान वयांतहि त्याच्या चालण्याबोलण्यांत आणि लहानमोठ्या कामांत शिस्त, नीटनेटकेपणा, चिकाटी, आत्मविश्वास हे गुण चांगल्या तऱ्हेनें दिसूं लागले. हातीं लागेल तें पुस्तक भराभर वाचून काढावें, त्यांतील चांगल्या महत्त्वाच्या गोष्टी आपल्या टिपणवहींत लिहून ठेवाव्या; त्या पुन्हा-पुन्हा वाचाव्या; याची त्याला संवय झाली. अशा प्रकारें वयाच्या आठव्या वर्षापर्यंत वडिलांच्या शाळेंत प्रफुल्लचंद्राचें शिक्षण झालें, आणि पुढील शिक्षणासाठीं त्याला कलकत्त्यास पाठविण्याचें ठरलें.

प्रफुल्लचंद्र वयानें जरी लहान होता तरी त्याला शिक्षणाची गोडी फार होती. म्हणूनच तो आपल्या प्रिय माणसांस सोडून दूर अशा कलकत्ता शहरांत जाण्यास तयार झाला. नऊ वर्षांचा बाल–प्रफुल्लचंद्र जेव्हां कलकत्त्यास निघाला तेव्हां वडिलांनीं त्याला

जवळ घेऊन विचारिलें, 'प्रफुल्ल, तूं कलकत्त्याला राहशील ना?'

'हो. न राहायला काय झालें? मधून मधून तुम्ही मला भेटायला या. मी पण मोठ्या सुटींत घरीं येईन.

हरीशबाबूंना बरें वाटलें. ते म्हणाले, 'मी तुला भेटायला वारंवार येईन हं!'

आणि मग हरीशबाबू प्रफुल्लचंद्राला घेऊन कलकत्त्यास गेले. कलकत्त्यासारखें मोठें शहर प्रफुल्लचंद्रानें यापूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें, त्यामुळें हें शहर पाहून तो आश्चर्यचकीत झाला, भांबावला, गोंधळला तर त्यांत नवल कसलें?

पहिल्या दिवशीं प्रफुल्लचंद्र बुजलाच. पण त्याचा तो बुजरेपणा लवकरच नाहींसा झाला आणि तो कलकत्त्याच्या हेअर हायस्कूलमध्यें जाऊं लागला.

असें सांगतात कीं, पहिले दोन दिवस प्रफुल्लचंद्राच्या वर्गांतील मुलें त्याच्याशीं मुळीं बोलेनातच! उलट तीं आपापसांत कुजबुजत. प्रफुल्लचंद्राकडे पाहात आणि हसत. तो सारा प्रकार पाहून प्रफुल्लचंद्रास वाईट वाटे. तो स्वतःच इतर मुलांशीं बोलण्याचा प्रयत्न करी. पण त्यांत त्याला यश येईना. इतर मुलें त्यास 'आपलासा' म्हणण्यास तयार होईनात.

## स्वभावांतील गोडवा

पण हें वातावरण लवकरच म्हणजे तीन-चार दिवसांतच पार नाहींसें झालें, आणि याला कारण

प्रफुल्लचंद्राची हुशारी. वर्गातील एका मुलाबद्दल दाखविलेली आपुलकी, बंधुप्रेम, स्वभावांतील गोडवा.

प्रफुल्लचंद्र खेडेगांवांतील एका लहानशा शाळेंतून जरी मोठ्या शहरांतील हायस्कूलमध्यें आला होता, तरी तो वर्गांत हुशार होता. शिक्षकांनीं विचारलेल्या कोणत्याहि प्रश्नाचें उत्तर तो आत्मविश्वासानें बिनचूक देई. पुढें-पुढें तर असें ठरूनच गेलें कीं, वर्गांतील कोणत्याहि मुलास विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देतां आलें नाहीं कीं, गुरुजींनीं म्हणावें, 'प्रफुल्ल, आतां तूं सांग पाहूं या प्रश्नाचें उत्तर!' आणि मग प्रफुल्लचंद्रानें चटकन उभें राहून विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर सांगावें! प्रफुल्लचंद्राच्या या हुशारीचा परिणाम विद्यार्थ्यांत द्वेषाचा न होतां आदराचा, आपुलकीचा, प्रेमाचा झाला. आणि याला आणखीहि एक कारण घडलें, तें म्हणजे प्रफुल्लचंद्राच्या अंगीं वसत असलेला बंधुप्रेम हा गुण. प्रफुल्लचंद्र सर्वांना अभ्यासांत मदत करी. 'एकमेकां साहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ' ही त्याची वृत्ति होती. भांडणें–रागावणें तर त्याला माहीतच नव्हतें. असा हा हुशार, परोपकारी विद्यार्थी वागतो कसा? तर लीनतेनें. यामुळें प्रफुल्लचंद्राचे सोबती आणि गुरुजी त्याच्यावर अलोट प्रेम करूं लागले, हें योग्यच होतें.

प्रफुल्लचंद्र मूळचाच हुशार आणि त्याला वाचनाची मिळालेली जोड. मग काय! दुधांत साखर पडली.

हुशारीला अधिक रंग चढला. शालेय अभ्यासांत तर त्याची 'हुशारी' दिसूं लागलीच, पण इतर व्यवहारांतहि ती कांहीं कमी दिसावयाची राहिली नाहीं.

## वाचनाची आवड

शालेय अभ्यासाबरोबर त्यांच्या हातीं जीं जीं इतर पुस्तकें येत; तीं तीं प्रफुल्लचंद्र भराभर वाचून काढूं लागला. त्यासाठीं जागरणें करूं लागला. खाण्या-पिण्यांतहि वाचनाच्या छंदामुळें नियमितपणा राहीना, डोळयांवरहि ताण पडूं लागला. शरीरप्रकृतीची हेळसांड होऊं लागली. आणि या सर्वांचा परिणाम प्रफुल्लचंद्राची प्रकृति बिघडण्यांत झाला. एवढ्या लहान वयांत त्यानें ज्ञानधनाचा सांठा करण्याचा सपाटा चालविला, पण त्याचबरोबर प्रकृतिधन गमाविलें—जणूं काय ज्ञानधन मिळविण्यासाठीं प्रकृतिधनाचें मोल द्यावें लागलें. कलकत्त्यांतील अवघ्या चारच वर्षांच्या वास्तव्यानें प्रफुल्लचंद्र इतका आजारी पडला कीं, त्याला कलकत्ता सोडून आपल्या घरीं जाणें भागच पडलें.

प्रफुल्लचंद्र आजारी पडला आणि तो आपल्या घरीं गेला. आतां त्याच्या शालेय अभ्यासांत खंड पडला, असें आपणाला वाटणें अगदीं साहजिकच आहे, पण हें 'वाटणें' तितकेसें खरें नाहीं. कारण प्रफुल्लचंद्रानें आपल्या या आजारीपणांतच पुढील आयुष्यांत अतिशय उपयोगी पडेल अशा इतर अभ्यासाची तयारी केली. पुढें जगांत जी कीर्ति मिळणार होती, तिची पूर्वतयारी

केली. यासाठीं त्यानें आपल्या आजारीपणाचा भरपूर फायदा करून घेतला. त्यानें विचार केला, आपण तर आजारी. आजारीपणांत कांहीं शारीरिक काम करतां येणार नाहीं, फिरतां येणार नाहीं कीं, खेळतांहि येणार नाहीं. बिछान्यावर नुसतें पडून राहिलें पाहिजे. 'ताटा-वरचें पाटावर आणि पाटावरचें ताटावर' एवढीच काय ती हालचाल करावयाची! हें कांहीं बरें नाहीं. ईश्वरानें आजारीपण दिलेंच आहे तर या संधीचा योग्य उपयोग मीं कां करून घेऊं नये? बिछान्यावर पडून तर राहावयाचें आणि वाचावयाचें. जितकें वाचतां येईल तितकें वाचावयाचें. शरिराला ना मेहनत ना त्रास!

—असा विचार करून प्रफुल्लचंद्रानें आपल्या वडिलांच्या लायब्ररींतील पुस्तकें एकामागून एक वाचण्याचा सपाटा चालविला. वाचनानें त्याला उत्साह वाटूं लागला, आनंद होऊं लागला. या उत्साहाच्या आणि आनंदाच्या भरांत त्याचें आजारीपण कुठच्या कुठें पळून गेलें. उत्साह अधिकच वाढला, आनंद अधिकच होऊं लागला. वाचनांत तो कधीं कधीं इतका गढून जात असे कीं, त्याला जेवणाची किंवा कपड्यांचीहि शुद्ध नसे!

## मीहि असाच होईन का!


सारा ग्रंथसंग्रह त्यानें दोन वर्षांच्या या मुदतींत पालथा घातला. या वाचनालयांतील चेंबर ऑफ् बायाग्राफीनें त्याला जवळजवळ वेडच लाविलें.



प्रफुल्लचंद्राचें आजारीपणांतहि सतत वाचन. पान ११



प्रफुल्लचंद्राचा नौकाविहार. पान १६



शास्त्रज्ञांचीं व्याख्यानें ऐकण्याची सुवर्णसंधि
प्रफुल्लचंद्र कधीं दवडीत नसे. पान २०




'बंग पूर्वीचें व नंतरचें हिंदुस्थान' या निबंधाच्या
निकालाचें पत्र पोस्टमन लंडन येथें
प्रफुल्लचंद्रास देत आहे. पान ३५

विशेषत: गॅलिलिओ, न्यूटन, बेंजामिन फ्रांकलिन यांच्या चरित्रांनीं तर त्याच्या मनावर इतकी पकड बसविली कीं, तीं चरित्रें त्यानें एकदांच नव्हे, तर अनेकदां वाचून काढलीं. गॅलिलिओला लहानपणीं त्याच्या बापानें–व्हिनसेन झिओनें त्याला इटली देशांतील पिसा येथील एका मठांत शिक्षणासाठीं ठेविला होता; पण डोळ्याच्या आजारामुळें त्याला परत घरीं यावें लागलें होतें. प्रफुल्लचंद्रालाहि आजारीपणामुळें कलकत्त्याहून शिक्षण सोडून परत घरीं यावें लागलें होतें. न्यूटनचीहि स्थिति अशीच झाली होती. तो लहानपणीं केंब्रिज येथील ट्रिनिटी कॉलेजांत शिकत असतां लंडन शहरांत प्लेगचा प्रादुर्भाव झाला. शाळा-कॉलेजें बंद पडलीं; त्यामुळें न्यूटनला आपलें शिक्षण थांबवून परत घरीं यावें लागलें होतें. आपली जी आज स्थिति झाली आहे, आणि शिक्षणांत जसा खंड पडला आहे, तशीच कांहींशी स्थिति या थोर लोकांची त्यांच्या लहानपणीं झाली होती. त्यांच्याहि शिक्षणांत खंड पडला होता, हें वाचून ह्या संशोधकांबद्दल प्रफुल्लचंद्रास आपुलकी वाटूं लागली. ते अगदीं जवळचे सोबती असें वाटूं लागलें. या थोर संशोधकांच्या चरित्र वाचनानें प्रफुल्लचंद्रावर आणखी एक फार मोठाच परिणाम झाला, तो म्हणजे सतत उद्योग केला पाहिजे. प्रत्येक कामांत नियमित-पणा असला पाहिजे. निराशा आणि अपयश यांना कधींहि पाठ दाखवितां कामा नये. सतत प्रयत्न, पुन्हा-पुन्हा प्रयत्न केला पाहिजे, हीं तत्त्वें त्याच्या मनावर फारच चांगल्या प्रकारें बिंबलीं.

अशा प्रकारें 'ज्ञानकोश' करीत आणि थोर पुरुषांच्या चरित्रांपासून स्फूर्ति घेत असतां प्रफुल्लचंद्रांचें आजारीपण कुठच्या कुठें पळून गेलें. आणि तो ठणठणीत बरा झाला आणि एक दिवस त्यानें शालेय शिक्षणासाठीं कलकत्त्याची पुन्हा वाट धरली.

प्रफुल्लचंद्रानें आतां कलकत्त्याच्या आल्बर्ट हायस्कुलांत नांव दाखल केलें. 'ज्ञानकोश' बनलेला हा पंधरा वर्षांचा विद्यार्थी हुशार म्हणून ओळखला जाऊं लागला. सारे सोबती आणि गुरुजी त्याच्या बुद्धीची तारीफ करूं लागले. साधेपणा, अंगांत सदासर्वदा नम्रपणा आणि परोपकारवृत्ति, यामुळें प्रफुल्लचंद्र सर्वांचा आवडता झाला. त्यानें या वेळींहि आपल्या वाचनांत खंड पडूं दिला नाहीं. वाचन अखंड चालू ठेविलें. इंग्रजी, बंगाली पुस्तकें तर त्यानें वाचलींच. शिवाय लॅटिन भाषेचाहि थोडासा अभ्यास करून या भाषेंतील चांगलीं-चांगलीं पुस्तकें वाचून काढलीं.

## शक्तिदेवीची उपासना

अशा प्रकारें शालेय पुस्तकांच्या व इतर निरनिराळ्या भाषेंतील पुस्तकांच्या वाचनानें प्रफुल्लचंद्राचा जगाशीं चांगला परिचय झाला. भावी कार्याची त्याची थोडीफार तयारीहि झाली आणि तो इ. स. १८७९ सालीं आपल्या वयाच्या आठराव्या वर्षी प्रवेश-परीक्षा पास झाला. प्रफुल्लचंद्राला अत्यानंद झाला, पण त्याला एक गोष्ट कळून चुकली कीं, आपणाला

जर पुढेंहि दरसाल असेंच यश मिळवावयाचें असेल तर आपल्या शरीरप्रकृतीची कुरकुर असतां कामा नये. शरीर अगदीं निरोगी असलें पाहिजे. मागें आपणाला शाळा सोडून घरीं जाऊन बसावें लागलें, तें केवळ शरीरप्रकृति निकोप नाहीं म्हणून. यापुढें तरी असा प्रसंग येऊं नये. आपलें इच्छित – आपलें ध्येय गांठतां यावें; यासाठीं आपली शरीरप्रकृति सुधारलीच पाहिजे. प्रफुल्लचंद्रानें आतां आपली प्रकृति सुधारण्याचें ठरविलें. मनाचा अगदीं निश्चयच केला!

शरीरप्रकृति सुधारण्याचे मार्ग त्या वेळीं प्रफुल्लचंद्राला दोनच दिसत होते. एक मार्ग सात्त्विक अन्न खाणें हा आणि दुसरा मार्ग योग्य असा सर्वांगसुंदर व्यायाम घेणें हा. सात्त्विक अन्न आणि तेंहि अगदीं नियमितपणें खाण्याचीं त्यानें काळजी घेतलीच.

पण व्यायाम कोणता घ्यावा? कुस्ती, बैठका अशा प्रकारचा शरीरावर एकदम ताण पडणारा व्यायाम कीं, फिरणें, सूर्यनमस्कार घालणें, यासारखा सोपा. कुस्ती, बैठका अशा प्रकारचा शरीरावर एकदम ताण पडणारा व्यायाम घेणें प्रफुल्लचंद्रास शक्यच नव्हतें. कारण त्याच्या शरीरांत पाहिजे तितका जोम नव्हता. म्हणून त्यानें दुसऱ्या प्रकारचा म्हणजे नियमित फिरण्याचा व्यायाम घेण्याचें ठरविलें.

– आणि तो नियमित फिरावयास जाऊं लागला. मोकळी शुद्ध हवा आणि फिरण्याचा सर्वांगसुंदर

व्यायाम, यामुळें प्रफुल्लचंद्राची शरीरप्रकृति दिवसें-दिवस सुधारूं लागली. त्याला व्यायामाचें महत्त्व अधिकाधिक उमजूं लागलें. शरीर सुदृढ तर मन सुदृढ याची खात्री पटूं लागली. तो आपल्या मित्रांस म्हणूं लागला, 'अरे वेडयांनो, तुमच्यापैकीं कुणाला सुदृढ होण्याची इच्छा आहे का? माझ्याजवळ औषध आहे. सांगूं का औषधाचें नांव. नियमितपणें घ्याल का तें औषध?'

आणि मग प्रफुल्लचंद्र मित्रांच्या कानांत आपल्या या औषधाचें नांव हळूच सांगे.

मग मित्र म्हणत, 'असं होय! उद्यांपासून सुरुवात करतों.'

अशा प्रकारचीं वचनें प्रफुल्लचंद्र आपल्या मित्रां-कडून घेई व त्यांना व्यायामाची गोडी लावी.

प्रफुल्लचंद्र जसा फिरण्याचा व्यायाम घेऊं लागला तसाच तो पोहण्याचाहि व्यायाम घेऊं लागला. नौकें-तून विहार करण्याची त्याला गोडी लागली. व्यायाम होऊं लागला. शरीरप्रकृति दिवसेंदिवस सुधारूं लागली, मन प्रफुल्लित राहूं लागलें. उत्सुकता वाढली. हुरूप वाढला. पूज्य विनोबाजी भावे यांनीं गीताईमध्यें सांगितल्याप्रमाणें :

"प्रसन्नतेपुढें सर्व। दुःखें जाती झडोनिया।
प्रसन्नतेनें बुद्धीची। स्थिरता शीघ्र होतसे।।"

## मन मोठें होऊं लागलें

प्रफुल्लचंद्राची शरीरप्रकृति दिवसेंदिवस सुदृढ बनूं लागली. मन प्रफुल्लित राहूं लागलें. ज्ञानलालसा पूर्वीच्या शतपट वाढली. समाजांत वावरणें, सार्वजनिक कार्यांत भाग घेणें वाढलें. शालेय शिक्षणाबरोबर इतर शिक्षणहि वाढलें आणि या सर्वांमुळें त्याचें मनहि मोठें बनत चाललें. समाजसेवेकडे त्याचें मन ओढ घेऊं लागलें. वाडवडिलांचा तो वारसा. त्याच्या घराण्यांतील प्रत्येक पुरुषानें आपल्या वडिलांपासून वारसा घेऊन तो पुढें चालविलेला. प्रफुल्लचंद्रानेंहि आपल्या वडिलांपासून समाजसेवेचा वारसा घेतला होताच; त्याशिवाय समाजसेवेच्या वारशांत आणखी भर घालावयास लावणारे त्या वेळचे बंगालमधील महार पुढारी व समाज सेवक बाबू केशवचंद्र सेन हे होत.

## समाज सेवेचा उगम

बाबू केशवचंद्र सेन हे बंगालमधील मोठे समाजसुधारक. ब्रह्मोसमाजाचे मुख्य आधारस्तंभ. ब्रह्मोसमाजांत ते व्याख्यानें देत. त्यांच्या व्याख्यानाला हजारोंनीं श्रोते असत. त्या काळीं धर्मांच्या बाबतींत मतामतांचा गलबला माजला होता. धर्म, लिंग, वर्ण हे भेद बाजूला सारून केवळ विश्वबंधुत्वाची भावना मनांत ठेवणें, निरनिराळ्या धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासास उत्तेजन देणें, गूढ सृष्टिनियमांचें संशोधन

करणें, अनुभवानें पटतील तेवढ्याच गोष्टींवर विश्वास ठेवणें अशाच मतांचा विशेष प्रभाव होता. सन १८७९ सालीं कर्नल ऑलकष्ट हे अमेरिकन गृहस्थ भारतांत आले व जात, धर्म, लिंग, वर्ण हे भेद बाजूस सारून केवळ विश्वबंधुत्वाची भावना मनांत बाळगून पटतील तेवढ्याच गोष्टींवर विश्वास ठेवणें, ह्या तत्त्वाचा ते प्रसार करूं लागले. सन १८७५ सालीं आर्यसमाजाची स्थापना झाली. रामकृष्ण परमहंसाच्या 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना झाली.

## लोकसेवा हीच ईश्वरसेवा

या सर्वांचा थोडाफार परिणाम प्रफुल्लचंद्रावरहि झाला. बाबू केशवचंद्र सेन यांच्या व्याख्यानाचाहि परिणाम प्रफुल्लचंद्रावर झाला. बाबू केशवचंद्र सेन आपल्या व्याख्यानांत आग्रहानें सांगत :

'लोकसेवा करा. लोकसेवा ही ईश्वरसेवा आहे.' बाबू केशवचंद्र सेन जी लोकसेवा करीत होते, तिला तोड नव्हती. बंगाली तरुण त्यांच्या वृत्तीला आणि कृतीला इतके मोहून गेले होते कीं, 'लोकसेवा करणें हेंच आपलें इतिकर्तव्य ! बस्स ! ! दुसरें कांहीं नाहीं,' असें त्यांस वाटूं लागलें होतें.

याच सुमारास म्हणजे इ. स. १८८२ च्या सुमारास बंगालमधील प्रसिद्ध कादंबरीकार बंकीमचंद्र चतर्जी यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या कादंबऱ्यांनीं तरुणांच्या मनाची पकड घेतली. बंगालमधील जुलमी

जमीनदार आणि त्यांना मदत करणारें सरकार यांच्या कारवायांवर या कादंबऱ्यांतून चांगलाच प्रकाश पाडला होता. बंकिमचंद्राचें 'वंदे मातरम्' हें गीत कादंबरींतूनच जनतेपुढें आलें व प्रत्येकाच्या तोंडीं तें गेलें. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी व बाबू आनंदमोहन बोस यांच्या विचारसरणीचा प्रभाव त्या वेळीं सगळीकडे पडला होता. राष्ट्रीय वृत्ति प्रकर्षानें निर्माण झाली होती. सरकारी कॉलेजांत प्रवेश मिळविण्यापेक्षां राष्ट्रीय पुरुषानें स्थापिलेल्या कॉलेजांत प्रवेश मिळविण्याकडे तरुणांचा ओढा अधिक होता. बंगालमध्यें तर हें जास्तच होतें. कांहीं जमीनदार व श्रीमंत लोकांनीं कलकत्त्यास एक राष्ट्रीय शाळा चालविली होती. ईश्वरचंद्र विद्यासागरांकडे या राष्ट्रीय शाळेची सर्व व्यवस्था होती. या शाळेचें महाविद्यालयांत रूपांतर ईश्वरचंद्रांनीं केलें. या महाविद्यालयास ईश्वरचंद्र हयात होते, तोंपर्यंत 'मेट्रा पॉलिटन महाविद्यालय' हें नांव मिळालें. त्यांच्या निधनानंतर त्यास 'विद्यासागर विद्यालय' हें नांव मिळालें. या 'मेट्रा पॉलिटन' महाविद्यालयांत शिकविण्याचें काम अंबिकाचरण मुजुमदार, सुरेंद्रनाथ बानर्जी इत्यादि मोठमोठे प्रोफेसर करीत. त्यामुळें 'मेट्रा पॉलिटन' विद्यालयांत प्रवेश मिळविण्याकरितां तरुणांची रीघ लागे.

## विज्ञान शास्त्राची आवड

प्रफुल्लचंद्रांनींहि याच महाविद्यालयांत प्रवेश मिळ-

विला. ते विद्यालयीन शिक्षण घेऊं लागले. अभ्यासा-व्यतिरिक्त जो वेळ मिळे त्याचा उपयोग ते वाचना-साठीं आणि इतर विद्यार्थ्यांस जरूर तर विद्याभ्यासांत मदत करण्यासाठीं करूं लागले. प्रफुल्लचंद्रांकडे लोक आदरानें पाहूं लागले. त्यांना बहुमानानें वागवूं लागले. प्रफुल्लचंद्रांत प्रौढपणा आला. ते आपल्या वेळेचा उपयोग अतिशय काटकसरीनें करूं लागले. शहरांत जर कुठें व्याख्यानें, प्रवचनें असलीं तर तीं ऐकण्याची संधि ते सहजासहजीं दवडीतनासे झाले.

सहज एकदा प्रफुल्लचंद्रांच्या कुणीतरी मित्रानें बातमी आणली कीं, प्रसिद्ध आंग्ल शास्त्रज्ञ सर अलेक्झांडर व जान इलियट हे दोघे कलकत्त्यास आले असून या दोघांचीं शास्त्रीय विषयावर प्रेसिडेन्सी कॉलेजांत उद्यांपासून व्याख्यानें आहेत.

प्रफुल्लचंद्रांच्या कानीं ही बातमी पडली. आतां ते प्रसिद्ध शास्त्रज्ञांचीं व्याख्यानें ऐकल्याशिवाय कसे राहातील! चालून आलेली सुवर्णसंधि ते कशी दवडतील! योग्य संधीचा फायदा हाच माणसाला यशस्वी करण्याचा मार्ग आहे. प्रफुल्लचंद्रांना हें माहीत होतेंच.

प्रफुल्लचंद्रांना या आंग्ल शास्त्रज्ञांचीं शास्त्रीय विषयावरील व्याख्यानें इतकीं आवडलीं कीं, त्यांची दृष्टि पूर्वीं समाजसेवेकडे – लोकसेवेकडे जशी वळली होती तशीच आतां ती शास्त्रीय विषयाकडे वळली.

त्यांना वाटूं लागलें, आपण शास्त्रीय विषयाचाच अभ्यास करावा. लहानपणीं त्यांनीं वडिलांच्या ग्रंथालयांतील एडिसन, न्यूटन वगैरे शास्त्रज्ञांचीं चरित्रें वाचलीं होतीं. आतां पुन्हा तींच चरित्रें आणखी एकदां वाचावींत, असेंहि त्यांस वाटूं लागलें.

## विज्ञान व लोकसेवा

प्रफुल्लचंद्रांनीं निरनिराळ्या ग्रंथालयांतून गॅलिलिओ, गॅलिलि, आर्किमिडीज्, कोपर्निकस, लुई पाश्चर इत्यादि अनेक शास्त्रज्ञांचीं चरित्रें मिळविलीं आणि तीं जसजशीं ते वाचूं लागले, तसतसें त्यांस असें वाटूं लागलें कीं, आपणहि ह्याच विषयाचा विशेष अभ्यास करावा आणि जमल्यास एखादा नवा शोधहि लावावा. आपली ही मनीषा त्यांनीं आपल्या एका जिवलग मित्रास बोलूनहि दाखविली. ते म्हणाले, 'मला शास्त्रीय विषयाचा विशेष अभ्यास करावा, असें वाटूं लागलें आहे.'

'हें कांहीं वाईट नाहीं; पण मला वाटतें, तुला तें जमणार नाहीं.'

'कृपा करून कारण सांग ना.'

'कारण फारसें महत्त्वाचें नाहीं पण मला वाटतें, शास्त्रीय विषयाच्या अभ्यासकांस लोकसेवा करतां येणार नाहीं. त्याला प्रयोग करण्यांतच आपला सारा वेळ घालवावा लागेल.'

'असं – असं ! पण तुला असें नाहीं का वाटत

कीं, मीं जर शास्त्रीय विषयांत शोध लाविला तर समाजाला त्याचा उपयोग होईल, आणि तीहि एक प्रकारची समाजसेवा माझ्या हातून घडेल.'

' हो ना! तर मग मी सांगतों, तुम्ही तुमचा हा आवडता विषय सोडूं नका. आपल्या ठरविलेल्या कामापासून एक तसूभरहि ढळूं नका. आपल्या बुद्धीला पटलेला मार्ग सोडून बुद्धीचा, परमेश्वरानें दिलेल्या दिव्य शक्तीचा अपमान करूं नका. निसर्ग तुम्हांला जें बनवूं इच्छितो, तेंच बना. तेंच तुमचें काम. तेंच तुमच्या जीवनाचें ध्येय. तोच तुमचा राम. त्यांतच तुम्हांला सफ़लता मिळेल, विजय मिळेल. सर्व कांहीं मिळेल.'

' वा! मित्रा, तूं तर मला आज फार महत्त्वाचा उपदेश करतो आहेस.'

' होय. आणखीहि मी तुला असें सांगतों कीं, तुम्हीं हातीं घेतलेलें काम करतांना मागें पुढें पाहूं नका. तुमचें भाग्य उदयाला येणें शक्य आहे.'

' मित्रा, तुझी इच्छा सफल होवो.'

दोघा मित्रांचें या विषयाचें बोलणें इथेंच संपलें.

—आणि दुसऱ्या दिवसापासूनच प्रफुल्लचंद्र शास्त्रीय संशोधनाच्या कार्याला लागले. सार्वजनिक कार्यांत अग्रभागीं चमकणारे प्रफुल्लचंद्र, मित्रमंडळींत बसून दिलखुलास चर्चा करणारे प्रफुल्लचंद्र, दुसऱ्यास आपल्या ज्ञानाचा लाभ देणारे प्रफुल्लचंद्र, व्याख्या-

नाच्या ठिकाणीं अग्रभागीं बसून व्याख्यान ऐकणारे प्रफुल्लचंद्र आतां क्वचितच दिसूं लागले. कारण कॉलेजचा अभ्यास करून जो कांहीं थोडाफार वेळ उरे तो शास्त्रीय संशोधनासाठीं जाऊं लागला. पण तें शास्त्रीय संशोधन म्हणजे एक खेळच होता. खेळास-सुद्धां योग्य साहित्य असावें लागतें, मग शास्त्रीय संशोधनासाठीं जे प्रयोग करावयाचे, त्याला साहित्य नको काय? साहित्याशिवाय प्रयोग कसे करतां येणार! प्रफुल्लचंद्रांजवळ साहित्य होतें कुठें! ! जें काय होतें, तें चार चिमटे आणि चार पांच नळ्या. एक दिवा — एक ना धड आणि भाराभर चिंध्या अशा स्वरूपाचें. तेंहि इकडून तिकडून गोळा केलेलें. अशा प्रकारच्या शास्त्रीय उपकरणांच्या साहाय्यानें प्रयोग कसे होणार! प्रफुल्लचंद्रांनाहि वाटूं लागलें, हें असें कांहीं जमायचें नाहीं. आणि आपल्याजवळ संशोधनाच्या कामीं लागणारें साहित्य घेण्यास पाहिजे तितका पैसाहि नाहीं. शिवाय आपण हातीं घेतलेलें काम जर समाधानकारक व्हावयास पाहिजे असेल तर आपणांस या विषयाचें अधिक ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. या विषयाचा अधिक अभ्यास केला पाहिजे आणि हा अभ्यास करण्यासाठीं परदेशांतच गेलें पाहिजे.

## पैशाची सोय

पण या कामींहि पैशांची अडचण उभी राहिलीच. परदेशांत जाऊन शिक्षण घेण्यास थोडाथोडका का पैसा लागणार. प्रफुल्लचंद्रांची मिळकत तशी कांहींच

नव्हती. ते अत्यंत काटकसर करून आपला खर्च कसाबसा भागवीत होते व विद्याभ्यास करीत होते, त्यांतल्या त्यांत संशोधनहि करीत होते, आणि हें सारें मित्रमंडळींच्या मदतीवर. वडील जमीनदार खरे पण त्यांनीं आपली सारी संपत्ति जनसेवेसाठीं खर्च केली होती. इतकेंच नव्हे तर त्यासाठीं त्यांनीं कर्जहि काढलें होतें. प्रफुल्लचंद्रांस घरून पैशांची मदत मिळण्यासारखी नव्हती. कलकत्त्यांत त्यांचे एक दोन मित्र घरचे बरे होते. त्यांपैकीं एकाजवळ कांहीं मदत मिळेल का विचारावें, असें त्यांस वाटलें, पण प्रत्यक्ष मदतीची मागणी त्यांच्यानें करवेना. कारण दुसऱ्याकडे अशा प्रकारची मदत मागण्याची वेळ त्यांच्यावर आजपर्यंत कधींच आली नव्हती. किरकोळ स्वरूपाची मदत त्यांचे मित्र करीत ही गोष्ट खरी, पण मित्र ती स्वयंस्फूर्तीनें करीत. आजचा हा मदतीचा प्रसंग जरा वेगळ्या स्वरूपाचा होता. मित्राजवळ मदतीची याचना करूं, कीं शास्त्रीय शिक्षण घेण्याची उत्कट इच्छा दाबून टाकूं? काय करूं? असा विचार त्यांच्या मनांत एकसारखा थैमान घालूं लागला. शेवटीं त्यांनीं आपल्या मनाचा हिय्या केला व एक चिठ्ठी लिहून ती मित्राच्या खिशांत टाकून ते त्याला म्हणाले, 'ही चिठ्ठी इथें नाहीं वाचायची. घरीं जा आणि मग वाच.'

चिठ्ठी मित्राच्या खिशांत टाकतांना प्रफुल्लचंद्रांना वाटत होतें, आपण मदतीची मागणी केली आहे ती

परतफेडीच्या अटीवर. मित्र या माझ्या मागणीला कांहीं 'नाहीं' म्हणावयाचा नाहीं. मदत मिळेलच. आतां परदेशीं कधीं जावयाचें हेंच नक्की ठरवावयाचें.

पण दुसऱ्याच दिवशीं त्यांना मित्राकडून उत्तर मिळालें, तेंहि एका चिठ्ठीनेंच.

मित्रानें चिठ्ठींत लिहिलें होतें :

'आपली इच्छा चांगली आहे. शिक्षणासारख्या पवित्र कार्याला मदत करणें योग्य! पण मला तें शक्य होणार नाहीं. मैत्रींत बिघाड नसावा.'

प्रफुल्लचंद्रांनीं ती चिठ्ठी जेव्हां वाचली, तेव्हां त्यांना क्षणभर अतिशय वाईट वाटलें. पण तें क्षणभरच. त्यांच्या मनांत त्या वेळीं असेहि विचार आले कीं, मित्रानें मदत नाकारली किंवा त्याला तसें करणें शक्य नसेल तर मला त्याबद्दल कां वाईट वाटावें? मला स्वतःच पैसा जमवून शिक्षणासाठीं परदेशीं कां जातां येऊं नये? एखादी सरकारची शिष्यवृत्ति मिळवून स्वतःच्या पैशांची अडचण मला कां दूर करतां येऊं नये? आणि त्याच विचारानें प्रफुल्लचंद्रांच्या मनांत ठाण मांडलें.

या वेळींच परदेशीं जाऊं इच्छिणाऱ्या हुशार विद्यार्थ्याला 'गिल्क्राइस्ट' नांवाची एक शिष्यवृत्ति देण्यांत येई. ही शिष्यवृत्ति आपणांस मिळाली तर

नव्हती. ते अत्यंत काटकसर करून आपला खर्च कसाबसा भागवीत होते व विद्याभ्यास करीत होते, त्यांतल्या त्यांत संशोधनहि करीत होते, आणि हें सारें मित्रमंडळींच्या मदतीवर. वडील जमीनदार खरे पण त्यांनीं आपली सारी संपत्ति जनसेवेसाठीं खर्च केली होती. इतकेंच नव्हे तर त्यासाठीं त्यांनीं कर्जहि काढलें होतें. प्रफुल्लचंद्रांस घरून पैशांची मदत मिळण्यासारखी नव्हती. कलकत्त्यांत त्यांचे एक दोन मित्र घरचे बरे होते. त्यांपैकीं एकाजवळ कांहीं मदत मिळेल का विचारावें, असें त्यांस वाटलें, पण प्रत्यक्ष मदतीची मागणी त्यांच्यानें करवेना. कारण दुसऱ्याकडे अशा प्रकारची मदत मागण्याची वेळ त्यांच्यावर आजपर्यंत कधींच आली नव्हती. किरकोळ स्वरूपाची मदत त्यांचे मित्र करीत ही गोष्ट खरी, पण मित्र ती स्वयंस्फूर्तीनें करीत. आजचा हा मदतीचा प्रसंग जरा वेगळ्या स्वरूपाचा होता. मित्राजवळ मदतीची याचना करूं, कीं शास्त्रीय शिक्षण घेण्याची उत्कट इच्छा दाबून टाकूं? काय करूं? असा विचार त्यांच्या मनांत एकसारखा थैमान घालूं लागला. शेवटीं त्यांनीं आपल्या मनाचा हिय्या केला व एक चिठ्ठी लिहून ती मित्राच्या खिशांत टाकून ते त्याला म्हणाले, 'ही चिठ्ठी इथें नाहीं वाचायची. घरीं जा आणि मग वाच.'

चिठ्ठी मित्राच्या खिशांत टाकतांना प्रफुल्लचंद्रांना वाटत होतें, आपण मदतीची मागणी केली आहे ती

परतफेडीच्या अटीवर. मित्र या माझ्या मागणीला कांहीं 'नाहीं' म्हणावयाचा नाहीं. मदत मिळेलच. आतां परदेशीं कधीं जावयाचें हेंच नक्की ठरवावयाचें.

पण दुसऱ्याच दिवशीं त्यांना मित्राकडून उत्तर मिळालें, तेंहि एका चिठ्ठीनेंच.

मित्रानें चिठ्ठींत लिहिलें होतें :

> 'आपली इच्छा चांगली आहे. शिक्षणासारख्या पवित्र कार्याला मदत करणें योग्य! पण मला तें शक्य होणार नाहीं. मैत्रींत बिघाड नसावा.'

प्रफुल्लचंद्रांनीं ती चिठ्ठी जेव्हां वाचली, तेव्हां त्यांना क्षणभर अतिशय वाईट वाटलें. पण तें क्षणभरच. त्यांच्या मनांत त्या वेळीं असेहि विचार आले कीं, मित्रानें मदत नाकारली किंवा त्याला तसें करणें शक्य नसेल तर मला त्याबद्दल कां वाईट वाटावें? मला स्वतःच पैसा जमवून शिक्षणासाठीं परदेशीं कां जातां येऊं नये? एखादी सरकारची शिष्यवृत्ति मिळवून स्वतःच्या पैशांची अडचण मला कां दूर करतां येऊं नये? आणि त्याच विचारानें प्रफुल्लचंद्रांच्या मनांत ठाण मांडलें.

या वेळींच परदेशीं जाऊं इच्छिणाऱ्या हुशार विद्यार्थ्याला 'गिल्क्राइस्ट' नांवाची एक शिष्यवृत्ति देण्यांत येई. ही शिष्यवृत्ति आपणांस मिळाली तर

आर्थिक अडचण दूर होईल आणि आपली शास्त्रीय शिक्षणाची इच्छा पूर्ण करून घेतां येईल, असें प्रफुल्लचंद्रांस वाटलें.

## पहिला नंबर आला पाहिजे

पण ह्या शिष्यवृत्तीसाठीं होणाऱ्या परीक्षेंत पहिला नंबर आला पाहिजे आणि याकरितां अभ्यास करणें जरूर आहे, हें प्रफुल्लचंद्रांस कळून आलें.

आणि या शिष्यवृत्तीसाठीं प्रफुल्लचंद्रांनीं अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यांनीं शिष्यवृत्ति मिळविण्याचा निश्चयच केला. दिवसाचे वीस तास ते अभ्यास करूं लागले. त्यांनीं आपणांला खोलींत जवळ-जवळ कोंडूनच घेतलें होतें. जणूं काय ते सुरवंटा-सारखा कोश तयार करीत होते. त्यांनीं खाण्यापिण्या-कडे लक्ष दिलें नाहीं. शरीरप्रकृतीची पर्वा केली नाहीं. जवळजवळ एक वर्षभर त्यांनीं असें केलें. त्याचा परिणाम शरीरप्रकृतीवर झाला खरा, पण प्रयत्नाचें फळ मिळालें. त्यांच्या हातीं यश आलें. त्यांना 'गिल्क्राइस्ट' शिष्यवृत्ति मिळाली. अत्यानंद झाला. उत्साह वाढला. नवचैतन्य प्राप्त झालें. उत्साहाच्या भरांत सारी शक्ति एकवटते ना? उत्साहाच्या पायावरच जगांतले मोठमोठे शोध लागतात ना? उत्साहानेंच होकायंत्राचा शोध लागला ना? गॅलिलिओच्या दुर्विणीचा शोध कोणीं लाविला? छापखान्याचा शोध कोणीं लाविला?

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तळहातावर शीर घेऊन लढायला स्वातंत्र्यवीरांना कोणीं उद्युक्त केलें? महात्माजींच्या हातून एवढी राष्ट्रसंवर्धक कामें कोणीं घडविलीं? वयाच्या पस्तिसाव्या वर्षी ईश्वरचंद्र विद्यासागरांना इंग्रजीचे धडे घ्यायला कोणीं तयार केलें? उत्साहानें! होय; आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं मोठीं कामें केलीं, त्यांना जर कोणीं कार्यप्रवण केलें असेल तर उत्साहानेंच. उत्साह ही यशाची जननी आहे. प्रफुल्लचंद्रांस 'गिल्क्राइस्ट' शिष्यवृत्ति मिळाली. त्यांचा उत्साह वाढला. ते परदेशांत शास्त्रीय शिक्षण घेण्यास जाण्याची तयारी करूं लागले. तेथील रीतिरिवाजांची माहिती मिळवूं लागले.

## परदेशीं गमन

त्यांनीं सारी तयारी केली, आणि ते सन १८८२ सालीं परदेशीं गेले.

प्रफुल्लचंद्र ज्या बोटीनें परदेशीं निघाले, त्या बोटीवर त्यांना बराच त्रास झाला. प्रथम या माणसाकड कुणी ढुंकूनहि पाहीना. तर मग डेकवर उभें राहून सृष्टिसौन्दर्याच्या आणि इतर जिव्हाळ्याच्या गप्पा-गोष्टी कोण मारतो! प्रफुल्लचंद्रांस तर अशी विवंचना उत्पन्न झाली कीं, परदेशांत आपलें पुढें होणार कसें! पहिले तीन चार दिवस त्यांनीं पुस्तकांत डोकें घालून कसेबसे काढले, पण एकसारखें वाचणार किती! एक दिवस ते असेच वाचून कंटाळल्यावर बोटीच्या डेकवर

येऊन सृष्टिशोभा पाहात उभे राहिले. तिथेंच एक तरुण युरोपियन उभा होता. प्रफुल्लचंद्रांस वाटलें, त्यानें आपल्याशीं बोलावें ? एकमेकांशीं बोलून, गप्पा विनोद करून हा प्रवास आनंददायक नाहीं का करतां येणार !

## बोटीवरील शिष्टाचार

प्रफुल्लचंद्र बराच वेळ डेकवर उभे राहिले. पण तो युरोपियन त्यांच्याशीं बोलला नाहीं कीं हंसलाहि नाहीं. प्रफुल्लचंद्र म्हणतात–" त्या पिंगट केसांच्या युरोपियनाचा मला इतका राग आला कीं, हा अरसिक माणूस माझ्या नजरेआड केव्हां होतो, असें मला झालें आणि मी माझी पाठ फिरवून मुद्दाम दुसरीकडे पाहूं लागलों. पण मला मात्र त्या वेळीं असें उमगलें नाहीं कीं, त्या युरोपियनानें प्रथम माझ्याशीं बोलावें; पण मी प्रथम त्या युरोपियनाशीं कां बोलूं नये ? शिष्टाचार हा दुसऱ्याजवळ असावा, असें नसून तो प्रत्येकाजवळ असावा. शिष्टाचारानें प्रत्येकानें वागावें. शिष्टाचार म्हणजे हृदयाची विशालता. मनाचा उदारपणा. विचारांची प्रगल्भता. पण या घटकेला ती माझ्यापासून दूर गेली होती कीं, काय कोण जाणे."

दुसऱ्या वेळीं जेव्हां प्रफुल्लचंद्र व तो युरोपियन डेकवर एकत्र आले, तेव्हां मात्र प्रफुल्लचंद्र जरा पुढेंच सरकून त्या युरोपियन तरुणास म्हणाले,

'देखावा छान आहे नाहीं !'

'होय. पण त्यासाठीं चित्रकाराची दृष्टि पाहिजे.'

'आपलें तिकीट कुठचें आहे ?'

'मला लंडनला उतरावयाचें आहे.'

आणि मग त्या दोघांचें थोडा वेळ बोलणें झालें. विशेषतः भारत किती मागासलेला आहे, लोकांच्या आचाराविचारांत कशी सुधारणा होणें आवश्यक आहे, याविषयीं त्या दोघांची त्या दिवसापासून पुढें मधून मधून चर्चा होऊं लागली. भारत जर प्रगतिपथावर आला पाहिजे, तर शास्त्रीय सुधारणा झपाट्यानें झाल्या पाहिजेत, असें त्यांच्या जेव्हां बोलण्यांत आलें, तेव्हां प्रफुल्लचंद्र चटकन् म्हणाले, 'हें मीं दोन वर्षांपूर्वींच हेरलें आहे. मी शास्त्राचा विद्यार्थी म्हणूनच इंग्लंडांत राहाणार आहें.'

'हें ऐकून मला अतिशय आनंद होत आहे.'

—अशा प्रकारें मुख्यतः भारताच्या प्रगतीच्या विचारांची देवाण-घेवाण करीत प्रफुल्लचंद्र लंडनला गेले. तेथून ते एडिंबरोला गेले आणि मग पुढें त्यांनीं स्कॉटलंडच्या राजधानींतील एडिंबरो येथील प्रसिद्ध विद्यालयांत आपलें नांव दाखल केलें. अगदीं साधें आणि काटकसरीनें राहून त्यांनीं आपलें शिक्षण चालू केलें. जेवण जवळजवळ एक वेळच ! कारण त्यांना काटकसरीनें राहणें जरूर होतें.

## तुमच्यासारखा एकहि विद्यार्थी नाहीं

असा हा हिंदी विद्यार्थी जरी साधा दिसत होता, तरी शिक्षणांत हुशार होता. इतर विद्यार्थ्यांस चटकन् आकलन न होणारा मुद्दा या हिंदी विद्यार्थ्यास तेव्हांच आकलन होत असे. त्यामुळें या विद्यार्थ्यावर त्याचे सगळेच गुरुजी खूष असत. ते म्हणत, 'प्रफुल्लचंद्र, तुमच्या इतकी शास्त्र विषयाची तळमळ दाखविणारे विद्यार्थी या विद्यालयाला फारच कमी लाभले. तुमच्यासारखा एकहि विद्यार्थी बरेच वर्षांत या कॉलेजांत दाखल झाला नाहीं.' त्यावर प्रफुल्लचंद्र हसून म्हणत, 'हें खरेंहि असेल. माझा देश परतंत्र आहे—दरिद्री आहे. तो स्वतंत्र व्हावा, संपन्न व्हावा, असें मला वारंवार वाटतें. यासाठीं भारताला शास्त्रीय ज्ञानाची अत्यंत जरुरी आहे. पुढें मागें भारतीय तरुण शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर अनेक कारखाने काढतील. नाना प्रकारचा माल तयार करतील. शास्त्रीय सुधारणांनींच भारत 'सुजलाम् सुफलाम्' होईल. मीं ज्ञान मिळवावें आणि माझ्या देशाला त्याचा थोडाफार उपयोग व्हावा, असें मलाहि वाटतें. त्यासाठीं माझी ही सारी धडपड आहे.'

प्रफुल्लचंद्रांचे भारताच्या प्रगतीबद्दलचे हे विचार होते. आपल्या देशासाठीं आपली विद्या, आपलें श्रम, आपलें जीवन उपयोगी पडावें, ही त्यांनीं वडिलांपासून मिळविलेली इच्छा त्यांच्या मनांत सतत वास करीत

होती आणि त्या दिशेनेंच त्यांची ध्येयासाठीं वाटचाल चालू होती. त्यांचें ध्येय आपण शास्त्रीय विषयांत पारंगत व्हावें असें होतें. तरी पण त्यांनीं इतर विषयांकडे अगदींच दुर्लक्ष केलें होतें, असें कांहीं नाहीं. प्रफुल्लचंद्र युरोपियन लोकांच्या समाजशास्त्राचा, इतिहासाचा, त्यांच्या चालीरीतींचा अभ्यास करीत होते. त्यासाठीं जेव्हां जेव्हां त्यांना सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याची संधि मिळे, तेव्हां तेव्हां ते उत्साहानें भाग घेत होते. त्यामुळें सर्वांच्या नजरेसमोर हा भारतीय विद्यार्थी आला होता. मूळच्याच हुशार असलेल्या या विद्यार्थ्याची कॉलेजांतील प्रोफेसर मंडळी जशी वाहवा करीत होती, तशी इतर सारी विद्वान् मंडळीहि त्याची स्तुति करीत होती. तसें म्हटलें तर सर्वच भारतीय विद्यार्थ्यांबद्दल इंग्लंडमधील जनतेचा हा आदर वरकरणी असावा, असें केव्हां केव्हां वाटूं लागे, आणि त्याला कारणहि तसेंच घडलें होतें. सन १८५७ चें स्वातंत्र्यसमर होऊन पुरतीं चाळीस वर्षेंहि पुरीं झालीं नव्हतीं. भारतांतील जनता आपापसांत कुजबुजून सभा-संमेलनें भरवून इंग्रजांबद्दलचा आपला असंतोष दर्शवीत होती. परदेशी माल – परदेशी वस्तु न वापरल्यानें भारत कसा संपन्न होईल, याचें चित्र न्या. रानड्यांसारखी विद्वान् तरुण मंडळी आपल्या बांधवांस पटवून देत होती. कांहीं क्रांतिवीर सशस्त्र क्रांति करून इंग्रजांस दहशत बसविण्याचा प्रयत्न करीत होती.

## निबंधास बक्षीस मिळालें

या सर्वांचा परिणाम इंग्रज सरकारवर भारतांत जसा झाला, तसा तो इंग्लंडमध्येंहि तेथील जनतेवर झाला. म्हणूनच कीं काय, तेथील एका संस्थेनें 'बंडा-पूर्वीचें हिंदुस्थान व नंतरचें हिंदुस्थान' या विषयावर निबंध मागविले. ही निबंधाची चढाओढ सर्वांसाठीं खुली ठेविली खरी, पण कोणत्याहि भारतीयानें तींत भाग घेणें अत्यंत नाजूक काम होतें. निबंधांत कठोर सत्याचें निवेदन करणें म्हणजे पदरीं अपयश घेणें हें तर होतेंच, शिवाय रोषहि पत्करावा लागणार होता; आणि सत्याचा अपलाप करणें म्हणजे सत्य सोडून असत्याची तरफदारी करणें व आपल्या प्रिय माय-भूमीचा विश्वासघात करणें, तिची प्रतारणा करणें, असेंहि करावें लागणार होतें.

प्रफुल्लचंद्रांनीं असत्याची कांस कधींच धरली नव्हती. त्यांच्या घराण्याचा सत्यानेंच वागण्याचा धर्म होता. 'सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप' हें वाक्य आपल्या हृदयावर कोरून त्याची अत्यंत काळजीपूर्वक जतन करीत असलेले प्रफुल्लचंद्र केवळ निबंधाच्या बक्षिसासाठीं आपल्या प्रिय देशाच्या संसाराचें सत्य, शिव आणि सुंदर रूप लपवून त्या ऐवजीं खोटेंनाटें प्रदर्शन कसें करतील! आणि, देश-द्रोह पत्करण्यास कसे तयार होतील! त्यांनीं 'बंडा-पूर्वीचें हिंदुस्थान व नंतरचें हिंदुस्थान' ह्यावर निबंध

लिहिण्याचें तर ठरविलें पण केवळ बक्षीस मिळावें, ह्या हेतूनें नव्हे तर भारताची सत्य परिस्थिति काय आहे, हें कांहीं इंग्रज लोकांना तरी कळावें ह्या हेतूनें.

## निबंधासाठीं परिश्रम

प्रफुल्लचंद्रांनीं एखादें काम हातीं घेतलें म्हणजे त्यासाठीं होणाऱ्या श्रमाची ते कधींच पर्वा करीत नसत. काम शक्य तितकें निर्दोष आणि चोख करावयाची त्यांची वृत्ति होती. निबंधासाठीं त्यांनीं पुष्कळच माहिती गोळा केली. भारतांतील आपल्या मित्रांना त्यांनीं पत्रें लिहिलीं आणि माहिती मागविली. पाहिजे असलेली माहिती ज्या ज्या ठिकाणांहून त्यांना मिळण्याची शक्यता होती त्या त्या ठिकाणांहून ती त्यांनीं मिळविली आणि 'बंडापूर्वींचा व नंतरचा हिंदुस्थान' हा निबंध लिहून पुरा केला. या निबंधांत त्यांनीं ब्रिटिश सरकारवर चांगलीच टीका केली. ब्रिटिश सत्तेचें ग्रहण लागण्यापूर्वी भारत कसा 'सुजलाम् सुफलाम्' होता, त्याचें वैभव कसें होतें, मोंगल वगैरेंची सत्ता भारतांत जरी प्रस्थापित झाली होती, तरी त्यामुळें भारत कां दरिद्री बनला नव्हता, याचें अत्यंत मार्मिक विवेचन त्यांनीं केलें आणि इंग्रजी सत्तेचें ग्रहण लागल्यावर भारत कसा अधोगतीच्या मार्गाकडे चालला आहे, त्यामुळें भारतीय जनता दिवसेंदिवस कशी दुःखी, दुबळी होत चाललेली आहे,

हें त्यांनीं स्पष्ट व कडक शब्दांत दाखवून दिलें आणि तो निबंध पाठवून दिला.

निबंध पाठविला खरा, पण त्यांना यशाची आशा नव्हती. त्यांचे मित्रहि त्यांना निबंध लिहितांना म्हणत होते, 'कशाला हा डोंगर उपसतां ! हातीं उंदीरसुद्धां लागावयाचा नाहीं.' त्यावर प्रफुल्लचंद्र म्हणत असत, 'बक्षीस मिळणार नाहीं, हें मला माहीत आहे. मीं ह्या हेतूनें निबंध लिहिलाच नाहीं. माझ्या देशाची स्पष्ट व खरी परिस्थिति मी माझ्या निबंधांत मांडूं शकलों, – माझ्या हातून माझ्या देशाची ही एकप्रकारें सेवा घडावी ह्या एकाच इच्छेनें – यांतच माझें समाधान आहे. बक्षिसाच्या समाधानापेक्षां हें समाधान अधिक सात्त्विक, अधिक आनंददायक खचित आहे.'

प्रफुल्लचंद्रांचे हे विचार ऐकून त्यांच्या मित्रमंडळीला जरी तात्पुरतें समाधान होत होतें, तरी पण निबंधाच्या निकालाविषयींची त्या सर्वांची उत्सुकता कमी होत नव्हती. उलट निकालास जों जों उशीर होऊं लागला, तों तों त्यांची उत्सुकता अधिकाधिक वाढूं लागली.

असे बरेच दिवस गेले. आतां मात्र प्रफुल्लचंद्र आणि त्यांच्या मित्रमंडळींची अगदीं पुरी खात्री झाली कीं, आपला निबंध बक्षिसास पात्र नाहीं.

आणि या मंडळींनीं निबंधाचा हा विषय डोक्यांतून काढून टाकण्याचा प्रयत्न केला.

बरेच दिवस गेले. निबंध हा विषय जवळजवळ

पार विसरला गेला. ते आपल्या नित्याच्या अभ्यासांत आणि शास्त्रीय प्रयोग करण्यांत गढून गेले.

पण एक दिवस पोस्टमननें त्यांच्या हातीं एक पत्र दिलें.

काय होतें त्या पत्रांत?

'बंडापूर्वीचें व नंतरचें हिंदुस्थान' या विषया-वरील निबंधाचा निकाल.


पत्र वाचतांच प्रफुल्लचंद्रांस आनंद झाला. निबंधाचा निकाल त्यांना अनुकूल होता. पहिल्या नंबरचें नाहीं, तरी दुसऱ्या नंबरचें बक्षीस मिळालें होतें! गुरु, सहकारी, मित्रमंडळी, यांजकडून त्यांचें अभिनंदन झालें. वर्तमानपत्रांनींहि त्यांचा गौरवपर उल्लेख केला. या निबंधानें प्रफुल्लचंद्रांस 'आपण लिहूंहि शकतों' याबद्दल आत्मविश्वास आला. वाचनाबरोबर लेखनहि करावें, असें त्यांस वाटूं लागलें. लेखनाची गोडी लागली. ते मधून मधून वर्तमानपत्रांत छोटेमोठे लेख लिहूं लागले. प्रमुख वर्तमानपत्रेंहि त्यांच्या लेखांना अग्रहक्क देऊं लागलीं. तरी पण प्रफुल्लचंद्रांनीं आपलें मुख्य कार्य जें विश्वविद्यालयीन शिक्षण त्याकडे दुर्लक्ष केलें नाहीं, उलट ते अधिक नेटानें अभ्यास करूं लागले.

## स्वयंप्रकाशित चंद्र


आणि ते विश्वविद्यालयीन परीक्षेंतहि वरच्या नंबरनें पास झाले. तरी पण त्यांच्या मनाचें पूर्ण समाधान झालें नाहीं. त्यांची ज्ञानपिपासू वृत्ति अधिकच

उंचावली. याच कॉलेजांत पुढील शिक्षण घ्यावें, असें त्यांच्या मनानें घेतलें. पण त्यासाठीं पैसा कोठून आणावा, हा प्रश्न आ वासून त्यांच्यापुढें उभा राहिला. पैशाचें पाठबळ नाहीं. घरून पैसा मिळण्याची आशा नाहीं. फक्त काय ती सरकारी शिष्यवृत्ति आहे. ती पुढेंहि चालू राहण्याची शक्यता आहे. पण त्या शिष्यवृत्तींत युरोपसारख्या देशांतील खर्च भागणें कठीणच. मित्रांना प्रफुल्लचंद्रांची ही अडचण ठाऊक होती. त्यांनीं प्रफुल्लचंद्रांस साहाय्य करण्याचें आश्वासन दिलें. पुढें या मित्रांच्या साहाय्याची गरज त्यांना भासली नाहीं. कारण त्यांनीं अतिशय काटकसरीनें सारे दिवस काढले. प्रफुल्लचंद्रांचें कॉलेजमधील काम आणि वर्तणूक हीं तेथील गुरुजींस इतकीं आवडलीं कीं, ते प्रफुल्लचंद्रांस गमतीनें म्हणूं लागले, 'आकाशांतील चंद्र परप्रकाशित असला तरी आमच्या कॉलेजांतील हा प्रफुल्लचंद्र स्वयंप्रकाशित आहे. हा आपल्या तेजानें कधीं ना कधीं जगाला चकित करून सोडील.'

प्रफुल्लचंद्रांच्या गुरुजींचें हें भाकीत पुढें खरेंहि ठरलें! चिकाटी आणि प्रयत्न यांच्या जोरावर ते इ. स. १८८८ सालीं डी. एस्सी. ( डॉक्टर ऑफ् सायन्स ) ही परीक्षा वरच्या क्रमांकानें नुसते पासच झाले नाहींत, तर त्यांनीं दोन शिष्यवृत्त्याहि मिळविल्या. या शिष्यवृत्त्यांपैकीं ' होप् प्राइझ ' ही शिष्यवृत्ति अतिशय बहुमानाची होती.




प्रफुल्लचंद्रांना नोकरीकरितां शिक्षणाधिकाऱ्यांकडे विनंति करावी लागत आहे. पान ३९



' कोणत्याहि गोष्टीबद्दल समाधान माना, पण ज्ञानाबद्दल—विद्येबद्दल समाधान मानूं नका असें विद्यार्थ्यांना सांगणारे प्राध्यापक प्रफुल्लचंद्र. पान ४१



विद्यार्थ्यांसह आपल्या प्रयोग-शाळेंत गढून गेलेले
आचार्य प्रफुल्लचंद्र. पान ४७



जगद्विख्यात ' मर्क्यूरस नाइट्रेट 'चा शोध
लागल्यावर आचार्य प्रफुल्लचंद्रांचा
जाहीर सन्मान होत आहे. पान ५१

अशा प्रकारें प्रफुल्लचंद्रांनीं आरंभापासून आपल्या हुशारीनें अडचणींना तोंड देत देत परदेशीं जाऊन शास्त्रविषयाची अत्युच्च पदवी मिळविली. इंग्लंड-मध्यें असतांना 'हिंदुस्थानचा एक अति बुद्धिमान्, प्रयत्नवादी, मनमिळाऊ आणि मैत्रीस योग्य असा विद्यार्थी' म्हणून प्रफुल्लचंद्रांच्या परिचयाची मंडळी त्यांजकडे आदरानें पाहात असत. ते पदवी घेऊन ज्या वेळीं भारतांत यावयास निघाले, त्या वेळीं त्यांच्या अनेक विद्वान् मित्रांनीं त्यांचा गौरव तर केलाच आणि भाकीतहि केलें कीं, 'प्रफुल्लचंद्र, तुमची विद्वत्ता, काम करण्याची हातोटी, संशोधन-वृत्ति, यामुळें तुम्ही न्यूटन, रुमफोर्ड, मायकेल फॅरॅडे यांच्या रांगेंत जाऊन बसाल.'

हें ऐकून प्रफुल्लचंद्र हसून म्हणाले, 'तुमची इच्छा पुरी करण्याची शक्ति मला ईश्वर देवो.'

## मायदेशीं आगमन

प्रफुल्लचंद्र भारतांत जेव्हां आले, तेव्हां त्यांचा ठिकठिकाणीं गौरव झाला. सत्कार झाले. गळ्यांत फुलांचे हार पडले. वर्तमानपत्रांनीं स्तुतिसुमनें वाहिलीं. कवींनीं काव्यसुमनें अर्पण केलीं. चित्रकारांनीं आपल्या कुंचल्यांनीं त्यांचीं चित्रें रेखाटलीं. पण उद्यांच्या जेवणाची सोय काय हा प्रश्न मात्र प्रफुल्लचंद्रांपुढें दत्त म्हणून उभा राहिला. आतां त्यांच्या मूळ गांवीं विशेष कांहींच राहिलें नव्हतें. वडिलोपार्जित पैसाअडका तर कांहीं

नव्हताच. त्यामुळें आतां त्यांना एकच एक उपाय होता; तो म्हणजे नोकरी !

## नोकरी ! !

प्रफुल्लचंद्रांस नोकरी करणें तितकेंसें पसंत नव्हतें, आणि त्यांच्या विद्वत्तेला साजेशी नोकरी तरी कुठें तयार ठेविलेली होती. सरकार प्रफुल्लचंद्रांकडे थोडेसें तिरक्या नजरेनेंच पाहात होतें. बंगाली तरुणाकडे असें पाहण्याची त्या वेळीं सरकारला खोडच लागली होती. इ. स. १८८८च्या पुढचा-मागचा चार दोन वर्षांचा काळ, हा 'सशस्त्र क्रांतिवीरांचा काळ' होता. या काळांत इंग्रजांस दहशत बसविण्याचे नाना प्रकार भारतीय तरुण वीर करीत होते. अशा या काळांत शास्त्र-विषयांत पारंगत असलेल्या बंगाली तरुणास सरकारनें नोकरी देण्याची तयारी दाखविणें शक्य तरी होतें का? नोकरीचा नाद सोडून उद्योगधंदा काढावा, तर त्याला आधीं भांडवल पाहिजे आणि तें तरी थोडेंथोडकें नव्हे, हजारांनीं! उद्योगधंदा करणें, शास्त्रीय प्रयोग-शाळा काढणें, ही आपली मनीषा तूर्त तरी पुरी होणें शक्य नाहीं, हें प्रफुल्लचंद्रांस माहीत होतें. म्हणून ते नाखुषीनें नोकरीच्याच शोधाला लागले.

नोकरी करून थोडा पैसा जमवावयाचा. त्यांतून जरूर तीं उपकरणें – साहित्य विकत घ्यावयाचें. प्रयोगशाळेसाठीं लहानशीच जरी जागा मिळाली तरी

ती मिळवावयाची आणि संशोधन करावयाचें, असें त्यांनीं मनाशीं ठरविलें.

आणि मग एक दिवस ते बंगाल सरकारच्या शिक्षण-खात्याच्या मुख्यास भेटावयास गेले.

'कां आलां आपण ?'

'आपणांजवळ नोकरी मागावयास आलों आहें. माझें नांव प्रफुल्लचंद्र रॉय. मी नुकताच युरोपहून शास्त्र विषयाची पदवी घेऊन आलों आहें. आपणांला हें कदाचित् माहीतहि असेल.'

'तुम्हांला नोकरी !'

'होय. मला नोकरीची जरुरी आहे.'

'तुम्ही शास्त्र विषयाचे पदवीधर आहांत, हुशार आहांत. तर नोकरीच्या मागें कां लागतां ? उद्योग-धंदा कां काढीत नाहीं ?'

'महाराज, आपलें म्हणणें बरोबर आहे. पुढेंमागें मी उद्योगधंदाहि काढीन, पण आज मला नोकरी करणें भाग आहे.'

'पुढेंमागें कशाला – आतांच काढा ना ! तुम्ही कांहींहि करा ना, पण आमच्याजवळ तुम्हांला योग्य अशी आज नोकरी नाहीं. पुढेंमागें जर तशी संधि आली, तर मी तुमचें नांव लक्षांत ठेवीन.'

प्रफुल्लचंद्र कांहींच बोलले नाहींत. त्यांना वाटलें, सरकारनेंच मला मानानें बोलावून एखाद्या कॉलेजांत प्रोफेसराची जागा पत्करण्याची विनंति केली पाहिजे

होती; पण तें नाहीं तर नाहीं. तथापि मीं जेव्हां स्वतःच नोकरीसाठीं विनंति केली, तेव्हां तरी मला माझ्या योग्यतेस साजेशी नोकरी सरकारनें नको का द्यायला! उलट मलाच खिजविण्यासाठीं, माझाच अपमान करण्याच्या हेतूनें मला विचारतात, 'तुम्ही इतके हुशार आहांत, तर उद्योगधंदा कां काढीत नाहींत!' उद्योगधंदा काढण्यासाठीं पैशाचें बळ लागतें, हें, ह्या शिक्षणाधिकाऱ्याला माहीत का नाहीं! पण सारें उपरोधिक बोलणें!

या उपरोधिक बोलण्याचा परिणाम प्रफुल्लचंद्रांवर फार झाला. अपमानापेक्षां मरण बरें, असें त्यांस वाटूं लागलें. 'तुम्ही इतके हुशार आहांत तर उद्योगधंदा कां काढीत नाहीं?' हे शब्द त्यांच्या हृदयांत बाणासारखे घुसले आणि तेव्हांच त्यांनीं मनाशीं निश्चय केला, 'योग्य संधि येतांच राष्ट्रहिताला पोषक असा एखादा कारखाना मी काढीनच काढीन!'

पण आज? त्यांना हें शक्य नव्हतें म्हणूनच इच्छा नसतांहि प्रयत्नांची शिकस्त करून पुढें कांहीं दिवसांनीं म्हणजे सन १८८९ सालीं कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत दरमहा अडीचशें रुपये पगाराची असि. प्रोफेसरची जागा त्यांनीं मिळविली.

पण ह्या जागेचाहि त्यांना लवकरच कंटाळा आला. नको ही प्रोफेसरकी! असें त्यांस झालें. कारण कॉलेज-

मधील काम ठराविक प्रयोग करून दाखवावयाचें. यांत इकडे तिकडे कांहीं नाहीं !

## प्रेमळ प्राध्यापक

प्रफुल्लचंद्र आपलें कर्तव्य म्हणून शिक्षणाचें कार्य परिश्रमपूर्वक करीत होते. पण त्यांत त्यांचें समाधान होत नव्हतें. विद्यार्थ्यांसारखाच मीहि एक विद्यार्थी आहें, मलाहि नवीन ज्ञानाचा संचय करावयास पाहिजे, अशी 'ज्ञानलालसा' त्यांस होती. ते आपल्या विद्यार्थ्यांस म्हणत, "तुम्हीं मिळविलेल्या कोणत्याहि गोष्टीबद्दल समाधान माना, पण ज्ञानाबद्दल–विद्येबद्दल समाधान मानूं नका. ती आणखी मिळवीन, तिचा आणखी संचय करीन, अशी इच्छा बाळगा. तिच्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करा; असें केलें तरच आपण सुखासमाधानाची एक एक पायरी चढत असतों आणि स्वतःच्या उंचीबरोबर आपल्या देशाची उंची वाढविण्याला हातभार लावीत असतों.' प्रफुल्लचंद्र आपल्या विद्यार्थ्यांस आणखीहि वारंवार असें सांगत कीं, 'जर तुम्ही अंतःकरणापासून उद्योगी असाल तर चालूं क्षण व्यर्थ दवडूं नका. जी गोष्ट तुम्ही करूं इच्छितां किंवा ज्या गोष्टीची तुम्ही सुखस्वप्नें रंगवितां, ती गोष्ट करण्यास आरंभ करा. तुम्हांला त्यांत आनंद लाभेल. उत्साह मिळेल. उत्साहाच्या प्रकाशांत आपलीं कामें करा. उत्साह म्हणजे प्रकाश. उत्साह म्हणजे दिव्य जीवन.' प्रफुल्लचंद्रांस एका ठराविक तऱ्हेचें प्रोफेसरचें

काम जरी आवडत नव्हतें तरी ते आपलें काम अत्यंत मेहनतीनें करीत असत आणि मिळणारें अडीचशें रुपयांचें वेतनहि काटकसरीनें खर्च करीत असत. वडिलांनीं लोकसेवेसाठीं केलेल्या कर्जाची फेड या मिळकतींतूनच ते करीत. गरीब विद्यार्थ्यांस मदत याच मिळकतींतून करीत आणि उरलेल्या पैशांतून चरितार्थासाठीं खर्च करून जें कांहीं उरें तें उद्योगधंदा काढण्यासाठीं शिल्लक ठेवीत. पैसा येण्याची एक वाट आणि त्याच्या जाण्याच्या तीन वांटा, त्यामुळें त्यांच्याजवळ शिल्लक ती कितीशी राहणार! तरी पण त्यांनीं चार वर्षांत आठशें रुपये शिल्लक ठेविले.

## थोडें भांडवल, पण आकांक्षा मोठी

ह्या आठशें रुपयांत कारखाना काढतां येईल का? असा विचार प्रफुल्लचंद्रांच्या मनांत वारंवार येऊं लागला. त्यांना एकदां वाटे; छे! आठशें रुपयांत कुणीं कुठें कारखाना काढला आहे!! कारखान्याचा हा विचार तूर्त तरी बाजूला ठेविला पाहिजे. तरी पण त्यांना ध्येयासाठीं वेडें झालेलें त्यांचें मन सांगे, 'मोठा नाहीं तर निदान छोटासा तरी कारखाना काढतां येईलच. या कारखान्यांत तरुणांना शिक्षणाचीहि सोय करतां येईल, आणि भारताला वैभवाच्या शिखरावर चढविण्यास हातभार लावितां येईल. आपले हे विचार प्रफुल्ल-चंद्रांनीं कांहीं उद्योगपतींपुढें मांडले. त्यांचा सल्ला विचारला, तेव्हां उद्योगपति म्हणूं लागले, 'प्रफुल्लचंद्र,

तुमच्याजवळ असलेल्या या रकमेंतच काय पण हिच्या दसपट रकमेंतहि कारखाना काढणें कठीण आहे. तुम्ही कशाला पडतां या फंदांत. तुमची आपली प्रोफेसरकी आहे तीच ठीक आहे. नका तुम्ही कारखाना काढण्याच्या फंदांत पडूं.'

पण हा सल्ला प्रफुल्लचंद्रांस पसंत पडत नव्हता. ते कागदावर कारखान्यास लागणाऱ्या पैशांचा हिशेब अनेक वेळां मांडीत होते आणि शेवटीं म्हणत होते, 'एवढ्या भांडवलांत कारखाना निघालाच पाहिजे.'

आणि त्यांनीं आपल्या म्हणण्याप्रमाणें कारखाना काढावयाचें निश्चित ठरवून या कारखान्यांत त्यांनीं एक प्रयोगशाळा काढण्याचेंहि नक्की केलें. या प्रयोगशाळेंत शास्त्रीय प्रयोग करतां येतील. या प्रयोगांत एखादा नवीन शोध लागला तर ! असेंहि त्यांना केव्हां केव्हां वाटे.

## लावीन लावीन, मीहि शोध लावीन !

केव्हां—केव्हां ! ! त्यांच्या डोळ्यांपुढें एडिसनच्या जीवनांतील एक प्रसंग नाचूं लागे. एडिसननें प्रयोग करून टेलिफोनचा जेव्हां शोध लाविला तेव्हां ओर्टन या श्रीमंतानें एडिसनपासून हा शोध विकत घ्यावयाचें ठरविलें. तो एडिसनला म्हणाला, 'टेलिफोनचा शोध तुम्ही विकूं इच्छितां ना ?'

'होय.'

'किती मोबदला घेण्याची आपली इच्छा आहे ?'

'आपण द्याल तितका मी घेईन.'

'असें कसें? शोध तुमचा आहे. तुम्हीच काय तें स्पष्ट सांगितलें पाहिजे.'

'तुमची काय देण्याची इच्छा आहे, तें तरी अगोदर समजूं द्या.'

त्यावर ओर्टन म्हणाला, 'मला वाटतें, मी या शोधाबद्दल तुम्हांला एक लाख डॉलर दिले, तर तें तुम्हांला आवडेल का?'

*एक लाख डॉलर! हे शब्द ऐकून एडिसन अगदीं खूष होऊन गेला.*

प्रफुल्लचंद्रहि खुषींत येऊन एकदां स्वत:शींच म्हणाले, 'लावीन, लावीन, ईश्वराची इच्छा असली तर मीहि एखादा शोध लावीन. मीहि लाखों रुपये मिळवीन. मलाहि मानवाचें कल्याण करण्याची संधि मिळेल.

## प्रयोगशाळा

हें सारें जमून यायला प्रयोगशाळा तर पाहिजे. प्रयोगशाळेसाठीं प्रफुल्लचंद्र जागा शोधूं लागले. कलकत्त्यांत बऱ्याच जागा पाहिल्या, पण त्या या ना त्या कारणानें गैरसोईच्या वाटल्या. शेवटीं त्यांनीं एक लहानशी जागा थोडयाशा भाडयानें घेतली आणि मित्राच्या साहाय्यानें तिथें आपली प्रयोगशाळा सुरू केली. प्रथम प्रथम त्यांना फार त्रास सोसावा लागला. प्रयोगशाळा झाडण्यापासूनचीं सारीं कामें त्यांना स्वत:च करावीं लागलीं. कारण नोकरचाकर ठेवण्यास

पैसा पाहिजे तो त्यांच्याजवळ कुठें होता! एखादी संस्था सुरू करणाराला प्रथम अशाच अडचणी असतात. अडचणींना मनुष्य घाबरला, तर अडचणी त्याचा नायनाट करतात. अडचणी एकटयाच येत नाहींत, एकामागून एक येतात. एका अडचणीला–एका संकटाला जो घाबरतो; त्याला इतर संकटें सळो कीं पळो करून सोडतात. पण अडचणींचें – संकटांचें जो प्रसन्नतेनें स्वागत करतो, त्याचीं संकटें त्याच्या यशांत भर घालतात. लो. टिळकांनीं 'केसरी' सुरू केला तेव्हां, *अण्णासाहेब कर्व्यांनीं* अनाथ महिलाश्रम काढला तेव्हां त्यांच्यापुढें अडचणींचे डोंगर आणि संकटांच्या रांगा उभ्या होत्या. लोकमान्य स्वतः छापखान्याची जागा झाडून स्वच्छ करीत आणि स्थानिक वर्गणीदारांच्या घरीं केसरीचे अंक स्वतः नेऊन टाकीत. अण्णासाहेब कर्वे पुण्याहून धान्य डोकीवर घेऊन सहा मैल चालत हिंगण्यास जात. हें सारें ते आपापल्या ध्येयासाठीं आनंदानें करीत. ध्येयापुढें अडचणी आणि संकटें उभीं राहात नाहींत. प्रफुल्लचंद्रांनीं एका ध्येयाकडे वाटचाल केली होती . व त्यासाठीं ते आपल्या प्रयोगशाळेंतील सर्वच कामें उत्साहानें व आनंदानें स्वतःच करीत होते.

## कारखाना

कॉलेजमध्यें शिकविण्याचें काम करावयाचें, प्रयोगशाळेंत प्रयोग करावयाचे आणि इतकें काम

करून जर वेळ मिळाला, तर सार्वजनिक कार्यांतहि ते उत्साहानें भाग घेत असत. प्रयोगशाळेलाच लहानसा कारखाना जोडला होता म्हणा, किंवा कारखान्याला लहानशी प्रयोगशाळा जोडली होती म्हणा! पण त्या कारखान्यांतहि जास्तींत जास्त, चांगल्यांत चांगल्या आणि स्वस्तांत स्वस्त अशा वस्तु तयार करण्याकडेहि लक्ष पुरवावयाचें, हीं सारीं कामें ते अत्यंत परिश्रम-पूर्वक करीत होते. त्यांना विश्रांति माहीत नव्हती. जें काम हातीं घेतलें तें करतांना स्वतःला अगदीं विसरून जावयाचें. सारी शक्ति, सारी बुद्धि तिथें ओतावयाची. आज हजारों लोक असे आहेत कीं, त्यांच्यांत ज्ञान आहे, भरपूर शक्ति आहे, पण ती ते एकत्रित करून एकाच कामांत खर्च करीत नाहींत. त्यांची शक्ति विखुरलेली आहे आणि विखुरलेली शक्ति कोणतेंहि काम नेटानें करण्यास असमर्थ असते. सूर्याचे किरण साऱ्या पृथ्वीवर पडतात; पण त्यांचा प्रभाव फारसा पडत नाहीं किंवा त्यांच्यांतील शक्ति चटकन् जाणवत नाहीं; पण तेच किरण जर भिंगांतून केंद्रित केले तर त्यांतून अग्नि निर्माण होतो. आपली शक्ति – बुद्धि अशीच केंद्रित केली तर हिचा प्रभाव चटकन् पडेल. प्रफुल्ल-चंद्र आपली शक्ति – बुद्धि केंद्रित करून कोणतेंहि काम पार पाडीत! असें सांगतात कीं, प्रफुल्लचंद्र आपल्या प्रयोगशाळेंत काम करीत असतां, त्यांच्या-जवळ त्यांचा जिव्हाळ्याचा एक मित्र येऊन उभा

राहिला. अर्धा तास, पाऊण तास, एक तास झाला तरी ते आपल्या प्रयोगाच्याच कामांत गर्क झालेले. मित्राकडे पाहून ते हसले नाहींत कीं, त्याच्याबरोबर बोलले नाहींत. शेवटीं त्यांचा तो मित्र कंटाळून रागानें निघून गेला. पुढें दोन-तीन दिवसांनीं जेव्हां त्याची आणि प्रफुल्लचंद्रांची गांठ पडली, तेव्हां ते आपल्या मित्रास म्हणाले, 'हल्लीं तूं फार दिवस भेटला नाहींस. मधून-मधून तरी भेटत जा.'

त्यावर तो मित्र रागानें म्हणाला, 'परवां मी तुमच्या प्रयोगशाळेंत आलों. तासभर तुमच्या शेजारीं उभा राहिलों, पण तुम्ही माझ्याबरोबर हसलां नाहींत, कीं बोललां नाहींत.'

'आं! तुम्ही माझ्या प्रयोगशाळेंत आला होतां! माझा नाहीं यावर विश्वास बसत.'

'मी असत्य बोलतों का?'

'मग मीच प्रयोगांत गढून गेलों असेन.'

आणि त्यांचें हें सांगणें कांहीं खोटें नव्हतें. ते आपल्या प्रयोगशाळेंत इतके गढून जात कीं, त्यांना आजूबाजूस काय-चाललें आहे, हें कळतच नसे. ते आजूबाजूचें जग विसरत. त्यांस जेवणाचेंहि भान राहात नसे. कित्येक दिवस, कित्येक महिने त्यांचें हें शास्त्रीय प्रयोगाचें कार्य चाललें तरी त्याचा त्यांना कंटाळा नाहीं, निराशा नाहीं असें त्यांचें कार्य चाले.

त्यांचे कित्येक प्रयोग फुकट जात होते. श्रम वायां जात होते. प्रथम उपकरणें आणि द्रव्यें जमविण्यासाठीं त्यांना फार श्रम पडले. एक आहे तर दुसरें नाहीं. दुसरें आहे, तर तिसऱ्या एखाद्यामुळेंच सारें अडून राहिलें, असें होऊं लागलें. सतत सर्वांची जुळवाजुळव करावयाची आणि शास्त्रीय प्रयोग करण्याच्या कामाला लागावयाचें. प्रथम प्रथम कांहीं आशा वाटेना; पण आशाच त्यांना गप्पहि बसूं देईना. ती मनाची समजूत करी–सोन्याच्या पावलांनीं असा एक दिवस येईल कीं, त्या दिवशीं 'यशस्वी झालों – यशस्वी झालों' असें म्हणून प्रफुल्लचंद्र नाचूं लागेल. निराशा म्हणे, 'प्रफुल्लचंद्रा, तूं वेडा तर नाहींस ! अरे, कशाला हा असला उद्योग करीत तासन् तास घालवितोस; तुला यांत यश मिळावयाचें असतें तर तें केव्हांच मिळालें असतें.' प्रफुल्लचंद्रांसहि वाटे, झालें तें बस्स झालें ! बंद करावा हा सगळा कारभार ! ! 'पारा आणि नैट्रिक ॲसिड यांचें विशिष्ट पद्धतीचें मिश्रण' ( मर्क्युरस् नाइट्रेट ) करण्यांत जर यश आलें असतें, तर शास्त्रीय जगांत फार मोठी क्रांति घडून आली असती. नवे नवे शोध लागण्यास मदत झाली असती. शास्त्राचा उपयोग माणसाच्या जीवनांत हरघडी झाला असता. पण हा शोध माझ्या हातून लागेल, असें मला वाटत नाहीं. आज चारशें वर्षें निरनिराळ्या थोर

शास्त्रज्ञांनीं या प्रयोगासाठीं घालविलीं. लाखों रुपयांचा चुराडा केला. आपलें सारें आयुष्य घालविलें; पण कोणा एकालाहि हा शोध लागला नाहीं. – असें जरी प्रफुल्लचंद्रांस माहीत होतें 'बस्स झालें! बंद करावा हा सगळा कारभार' असें जरी तोंडानें ते म्हणत होते, तरी हातानें प्रयोग करण्याचें काम रात्रंदिवस चाललेंच होतें. त्यांचा निश्चय त्यांना कार्यापासून ढळूं देत नव्हता. श्रमावांचून फळ नाहीं, हें त्यांना माहीत होतेंच.

## नवा शोध

प्रफुल्लचंद्र नेटानें प्रयोग करीतच होते. संशोधन चाललें होतें. त्याची नोंद चालली होती. टिपणें लिहिलीं जात होतीं. कधींतरी यश येईल, असें त्यांस वाटत होतें. श्रमावांचून फळ नाहीं.

आणि एक दिवस त्यांच्या दृढनिश्चयाला, त्यांच्या अविश्रांत श्रमाला भरघोस फळ आलें.

तो दिवस, भारताच्या गौरवाचा – कीर्तीचा – सुगंध पसरविणारा ठरला होता.

प्रफुल्लचंद्र यशस्वी झाले!

जीवांच्या घटकद्रव्यांपैकीं नायट्रोजन द्रव्य हा महत्त्वाचा घटक आहे. हवेमध्यें हा नायट्रोजन वायु ऑक्सिजनच्या म्हणजेच प्राणवायूच्या चौपट आहे. हवेंत इतक्या अधिक प्रमाणांत जरी हा वायु आहे तरी पण तो प्रत्यक्षपणें उपयोगांत आणतां येत नाहीं. वनस्पति आणि प्राणी यांना तो निराळ्या रूपांत

उपयोगासाठीं घ्यावा लागतो. प्राण्यांना नायट्रोजनयुक्त पदार्थ आपल्या आहारांत घ्यावेच लागतात. तसें न केलें तर शरीरास योग्य असा आहार मिळत नाहीं. प्राण्यांना विशेषतः मनुष्यांना नायट्रोजन ही अत्यंत महत्त्वाची आणि अत्यंत आवश्यक अशी वस्तु आहे. परंतु कोणत्याहि रासायनिक क्रियेनें तो पदार्थांत सामील होत नाहीं. म्हणूनच स्थिर असे नायट्रोजन-युक्त पदार्थ करण्याचे रसायनशास्त्रवेत्त्यांचे प्रयोग चालू होते. तसेंच पारा आणि नायट्रोजन संयुक्त करण्याचे प्रयोग निरनिराळ्या देशांत चालू होते. प्रफुल्लचंद्रांचें लक्षहि ह्याकडे वळलें. त्यांनीं अविश्रांत श्रम केले. तासन् तास प्रयोग केले आणि शेवटीं, त्यांना त्यांत यश आलें.

## दुमदुमलें यश दिगन्तरीं

प्रफुल्लचंद्र यशस्वी झाले !

पारा आणि नैट्रिक ॲसिड ( मर्क्युरस् नाइट्रेड ) यांच्या मिश्रणाचा शोध प्रफुल्लचंद्रांनीं लाविला ! प्रफुल्लचंद्रांना चंद्र हातीं मिळाल्याचा आनंद झाला. भगीरथाला स्वर्गांतून गंगा पाताळांत आणल्याचा जितका आनंद झाला तितका, द्रौपदीला आपल्या भावानें – श्रीकृष्णानें – थाली देऊन लाज राखल्याचा जितका आनंद झाला, त्यापेक्षांहि किती तरी पट आनंद प्रफुल्लचंद्रांस आपण शोध लावला याचा झाला. असें सांगतात कीं, ज्या वेळीं त्यांचा हा शोध लागला,

त्या वेळीं त्यांचा एक मित्र त्यांस प्रथम भेटला, तेव्हां प्रफुल्लचंद्रांनीं त्यास घट्ट मिठी मारली व ते आनंदानें ओरडले, सक्सेस! सक्सेस!!

सुमारें चारशें वर्षांपासून अनेक शास्त्रज्ञ ह्या शोधाच्या मागें लागले होते; पण एकाच्याहि प्रयत्नास यश आलें नव्हतें. एकहि शास्त्रज्ञ भाग्यशाली ठरला नव्हता. प्रफुल्लचंद्रांना यश आलें. ते भाग्यशाली ठरले!

त्यांच्यावर अभिनंदनाच्या तारांचा वर्षाव झाला. अभिनंदनपर पत्रांचे ढीगच्या ढीग प्रफुल्लचंद्रांच्या नांवें पोस्टांत येऊन पडले. सारा बंगाल आणि कलकत्ता अभिमानानें आनंदून गेला. सत्कारांना तर सीमाच नव्हती! वर्तमानपत्रांनीं अहमहमिकेनें शब्दसुमनमाला वाहिल्या. न्यूटन, गॅलिलिओ वगैरे नामांकित शास्त्रज्ञांत प्रफुल्लचंद्रांची गणना होऊं लागली. भारताचें श्रेष्ठत्व जगाला दिसून आलें. भारताच्या कीर्तींत भर पडली.

सारें जग प्रफुल्लचंद्रांची कीर्ति गात होतें; पण प्रफुल्लचंद्रांस मात्र आपण मोठे संशोधक आहोंत, असें म्हणवून घेण्यास भूषण वाटत नव्हतें. त्यांना आनंद झाला होता, तो आपण हातीं घेतलेलें काम पुरें केलें याचा—आपल्या या नव्या शोधानें आज ना उद्यां मानवजातीचें कल्याण होईल याचा – आणि आपण जे श्रम केले, शक्ति, बुद्धि आणि संपत्ति खर्चिली याचें योग्य चीज झालें याचा!

## लोकसेवा

प्रफुल्लचंद्र हे लोकसेवकाचे मुलगे. यांना लोकसेवेचें बाळकडू पाजलेलें. यांचा लोकसेवेकडे ओढा नसेल तरच नवल! भारतांतील आपले बांधव सुखी व्हावेत, स्वतंत्र व्हावेत, ह्याची त्यांना सतत तळमळ लागलेली. ना. गोखले, लो. टिळक, सुरेंद्रनाथ बानर्जी वगैरे मंडळी आपल्या देशबांधवांच्या सुखासाठीं करीत असलेले प्रयत्न ते पाहात होते. त्यांच्या ऐन उमेदींतच राष्ट्रीय सभेची स्थापना झालेली होती, लहानमोठ्या होत असलेल्या चळवळी ते पाहात होते आणि स्वतःहि त्यांत योग्य तो भाग घेत होते. त्यांना वाटत होतें, इंग्रजांनीं भारत दरिद्री बनविला. तो जर संपन्न व्हावयास पाहिजे, तर भारतांतील जनता सुशिक्षित झाली पाहिजे व भारतांत लहानमोठे अनेक कारखाने निघाले पाहिजेत.

## कारखाना कामगारांचा

प्रफुल्लचंद्रांनीं सन १८९२ सालींच रसायनाचा लहानसा कारखाना काढला होता. त्यालाच आतां मोठें रूप द्यावें, असें त्यांस वाटलें. या कामीं मुख्य अडचण पैशांची होती. पण ही अडचण कशी दूर करतां येईल, ह्याचा विचार करून त्यांनीं एक योजना तयार केली व ती आपल्या मित्रमंडळीपुढें ठेविली. ते आपल्या मित्रमंडळीस म्हणाले, " मित्र हो, आपण सन १८९२ सालीं ' केमिकल वर्क्स ' या नांवाचा लहानसा कारखाना काढला; त्याला आज दहा वर्षें झालीं.

अवघ्या आठशें रुपये भांडवलावर हा कारखाना सुरू झाला, तो वाढत वाढत आजच्या स्थितीस येऊन पोंचला आहे. तो आणखी वाढावा, त्यांतून आणखी कितीतरी प्रकारचा माल तयार होऊन बाहेर पडावा आणि तो गोरगरिबांच्याहि झोपडींत अल्प किमतींत जावा, अशी आपणां सर्वांची इच्छा असणें अगदीं स्वाभाविक आहे. यासाठीं अधिक भांडवलाची आवश्यकता आहे. आजपर्यंत या कारखान्यांत औषधेंच तयार होतात; यापुढें भारतांत न होणाऱ्या कांहीं वस्तुहि तयार व्हाव्यात, असें आपणां सर्वांप्रमाणें मलाहि वाटतें; पण या कामीं अधिक भांडवलाची आवश्यकता आहे. आज या कारखान्यांत जे कामगार काम करीत आहेत, जे या कारखान्याची व्यवस्था पाहात आहेत, जे या कारखान्यांतील मालाची देवघेव करीत आहेत व आश्रय देत आहेत त्यांचा हा कारखाना! मी या कारखान्याचा मूळ उत्पादक असलों, तरी पण आतां हा माझ्या मालकीचा नसावा. तो तुम्हां सर्वांचा असावा. कांहीं मंडळींनीं त्याची व्यवस्था पाहावी, अशी माझी इच्छा आहे."

## त्यागी वृत्ति

'केमिकल वर्क्स' सार्वजनिक असावा. एकट्या माझ्याच मालकीचा नसावा' हें वाक्य उद्‌गारतांच प्रफुल्लचंद्रांच्या डोळयांत आनंदाश्रु उभे राहिले.

अंकुराचा वृक्ष झाल्याचें पाहून माळ्याला कां आनंद होणार नाहीं !

प्रफुल्लचंद्रांचें मन मोठें. कारखाना स्वत:च्या मालकीचा ठेवून त्यांना कोटचवधि रुपये मिळवितां आले असते. पण त्यांना संपत्तीची हाव नव्हती, पर्वा नव्हती. जगाच्या उपकारकर्त्याला संपत्तीपेक्षां जनसेवा–लोकसेवा श्रेष्ठ वाटत होती. म्हणून त्यानें कारखानारूपी कल्पवृक्ष मंडळाच्या स्वाधीन केला.

कारखान्यासाठीं दोन लाख रुपयांचें नवें भांडवल उभारण्यांत आलें. कारखाना वाढविण्यांत आला. आणि नव्या स्वरूपांतल्या या कारखान्याचें नांव 'बंगाल केमिकल अॅण्ड फॉर्मास्युटिक वर्क्स लिमिटेड' असें ठेवण्यांत आलें. कारखाना वाढला. औषधें तयार होऊं लागलीं. रसायनें तयार होऊंलागलीं. हजारों माणसांना काम मिळालें. कित्येक कुटुंबें पोसलीं जाऊं लागलीं. रोपटें विस्तारलें. आज तरी औषधें व रसायनें तयार करण्याचा एवढा मोठा कारखाना आशिया खंडांत नाहीं, असें म्हणतात.

प्रफुल्लचंद्र शास्त्रज्ञ. त्यांनीं अद्वितीय असा महत्त्वाचा 'मर्क्युरस् नाइट्रेट'चा शोध लाविला खरा, पण त्यांचा खरा ओढा समाजसेवेकडेच होता. समाजाची सेवा कोणत्या ना कोणत्या प्रकारें आपल्या हातून घडावी, ही त्यांची उत्कट इच्छा त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. समाजसेवा हा त्यांच्या घराण्याच

स्वभावच होता. गाजावाजा न करितां जी कांहीं सेवा करतां येईल ती करावी, ही त्यांची वृत्ति. त्याच्या या वृत्तीमुळेंच त्या वेळच्या कित्येक थोर देशभक्तांनीं आणि बंगालमधील थोर पुढाऱ्यांनीं प्रफुल्लचंद्रांस राजकारणांत भाग घेण्याची विनंति केली. असें सांगतात कीं, एकदां बंगालमधील थोर देशभक्त प्रफुल्लचंद्रांकडे आले व त्यांस म्हणाले, 'प्रफुल्लचंद्रजी, बंगालमधील जनतेच्या वतीनें आम्ही आपणांस विनंति करण्यास आलों आहोंत. आपण ती मान्य करावी. आपण बंगालमधून आमदार पदाकरितां उमेदवार म्हणून उभें राहावें, अशी जनतेची आपणांस विनंति आहे.'

त्यावर प्रफुल्लचंद्र म्हणाले, 'जनतेचा मजवर लोभ आहे, याबद्दल मी जनतेचा कृतज्ञ आहें. पण मी आमदार होऊन काय करणार? आमदार असलों तरी मला लोकसेवा करतां येईल आणि नसलों तरी मला लोकसेवा करतां येईल. मग उगाच उमेदवार म्हणून उभें राहाण्यांत विशेष असें काय आहे?'

किती त्यागी मूर्ति ही! त्याग हा आयुष्यांतील एक कसोटीचा, परीक्षेचा प्रश्न असतो. यांत जो यशस्वी होईल तो कीर्तीचें, सुखाचें, आनंदाचें शिखर गांठील. प्रफुल्लचंद्रांस त्यागाचे प्रश्न जेव्हां जेव्हां सोडवावे लागत, तेव्हां तेव्हां ते त्यांत यशस्वी होत आणि म्हणूनच त्यांची कीर्ति जगभर पसरली. भारत सरकारनें तर त्यांना हिंद-साम्राज्याचा मित्र असा

बहुमान पुढें १९११ सालीं दिला. बंगाल तर प्रफुल्लचंद्रांच्या मुठींत. त्यांच्या अर्ध्या वचनांत ! बंगाल त्यांना आपलें घर वाटे. बंगालच्या हितासाठीं हातचीं सारीं कामें टाकून ते धावत. सन १९२२ सालीं उत्तर बंगालमध्यें फारच मोठा दुष्काळ पडला. अन्नावांचून माणसें पटापट मरूं लागलीं. तशांतच रोगराई उद्‌भवली.

## मदतीला धावले

प्रफुल्लचंद्रांनीं आपले शास्त्रीय प्रयोग तिथल्या तिथेंच बंद केले आणि ते तडक दुष्काळी भागांत धावले.त्यांनीं दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.आणि जेव्हां बंगालला दुष्काळी मदतीची अत्यंत जरुरी आहे, असें त्यांस आढळून आलें, तेव्हां त्यांनीं श्रीमंत लोकांना विनंति केली कीं, या दुष्काळांतून आपल्या बांधवांचे प्राण वांचविण्याची जर इच्छा असेल तर त्यासाठीं त्यांना अत्यंत अल्पकाळांत मदतीची जरुरी आहे.

प्रफुल्लचंद्रांची मागणी – विनंति कोण नाकारील ! तिकडे कोण दुर्लक्ष करील ! ! धनिक, व्यापारी वगैरे लोकांनीं प्रफुल्लचंद्रांच्या विनंतीला मान दिला. पैसे जमूं लागले. एका महिन्याच्या आंत तीन लाख रुपये जमले. श्रीमंत बायांनीं आपलें जडजवाहीर दिलें. कपडयांचे तर ढीगच्या ढीग जमले. प्रफुल्लचंद्रांनीं ‘ स्वयंसेवकांची जरुरी आहे ’ असें जाहीर केलें; हजारों तरुण स्वयंसेवक अल्पावकाशांत धावून आले!

आणि हें सारें केवळ प्रफुल्लचंद्रांच्या इच्छेमुळें !

त्यांच्या लोकप्रियतेमुळें. त्यांच्या कळकळीमुळें! प्रफुल्लचंद्र शास्त्रज्ञ जरी होते, तरी ते समाजसुधारक म्हणूनच खेड्यांपाड्यांतून ओळखले जात होते.

## महान् ग्रंथ

प्रफुल्लचंद्र शास्त्रज्ञ होते. शास्त्रज्ञ म्हटला कीं तो आणि त्याचे शास्त्रीय प्रयोग. प्रयोगशाळा हेंच त्याचें जग. त्याला इतर अनेक गोष्टींकडे पाहावयास वेळ नसतो म्हणा किंवा त्याला त्यांची गोडी नसते म्हणा; असाच बहुतेक शास्त्रज्ञांबद्दलचा आपला अनुभव आहे. पण आपल्या प्रफुल्लचंद्रांबद्दल मात्र आपणांस निराळा अनुभव येतो. ते शास्त्रज्ञ तर होतेच, पण लोकसेवक आणि उत्तम लेखकहि होते. लेखकाची गोडी त्यांना त्यांच्या लहानपणापासूनच लागलेली होती. विद्यार्थीदशेंत असतांना ते कविताहि रचीत; असें सांगतात. एडिंबरोला बी.एस्सी. चा अभ्यास चालू असतांना त्यांनीं 'बंडापूर्वीचा व नंतरचा हिंदुस्थान' ह्यावर निबंध लिहिला आणि तो इतका प्रभावी ठरला कीं, पार्लमेंटचे सुप्रसिद्ध सभासद जॉन ब्राइट, नामांकित पत्रपंडित आणि मोठमोठे राजकारणी धुरंधर यांनीं या निबंधाची स्तुति केली. पण याहिपेक्षां अति महत्त्वपूर्ण असा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे 'हिंदी रसायन शास्त्राचा इतिहास.' हा ग्रंथ त्यांनीं सतत १५ वर्षे मेहनत घेऊन लिहिला. पाश्चिमात्य देशांतील शास्त्रज्ञांनीं याहि ग्रंथाची

एकमुखी प्रशंसा केली. जर्मन पंडित या ग्रंथाविषयीं म्हणतात, 'हिंदी रसायनशास्त्राचा इतिहास' ह्या 'ग्रंथामुळें विज्ञानशास्त्रांत मौल्यवान् अशी भर पडली आहे.' याशिवाय त्यांनीं 'एका बंगाली रसायन शास्त्रज्ञाचें चरित्र व त्याचे अनुभव', 'वाङमयांत शास्त्रीय ज्ञानाचें स्थान' हीं पुस्तकें लिहिलीं. याशिवाय लहानमोठीं पुस्तकें आणि निरनिराळ्या मासिकांत छोटेमोठे लेख त्यांनीं कितीतरी लिहिले व शास्त्रासारखा अति रुक्ष विषयहि किती सुलभतेनें व मनोरंजक करतां येतो, हें पटवून दिलें. प्रफुल्लचंद्रांच्या कामगिरीचा सगळीकडे बोलबाला झाला. शुद्धाचरण, निःस्वार्थीपणा, विनयाची वागणूक; यामुळें त्यांचीं स्तुतिस्तोत्रें सगळीकडे गाइलीं जाऊं लागलीं. कोणत्याहि कामांत प्रफुल्लचंद्रांचा सल्ला घ्यावा, असें निरनिराळ्या संस्थांना वाटूं लागलें. प्रफुल्लचंद्रांनीं आपल्या विश्वविद्यालयाला भेट द्यावी, असें प्रत्येक विश्वविद्यालयाला वाटूं लागलें. प्रफुल्लचंद्रांनीं देशाच्या स्वातंत्र्यपाप्तीसाठीं राष्ट्रीय सभेला येऊन मिळावें, असें राष्ट्रीय सभेच्या नेत्यांना वाटूं लागलें. सामाजिक सुधारणा करूं पाहणाऱ्या संस्थांना वाटे, प्रफुल्लचंद्रांनीं समाजसुधारकांचें नेतृत्व पत्करावें. प्रफुल्लचंद्रांनाहि वाटे, भारताच्या उन्नतीसाठीं ज्या ज्या संस्था झटताहेत, त्या त्या संस्थांत आपण सामील व्हावें आणि त्यांना हातभार लावावा, आपल्या


शक्ति–बुद्धीप्रमाणें कार्य करावें. ज्या सरकारजवळ 'मला एखाद्या कॉलेजांत प्रोफेसरची जागा' मागावयास जावें लागलें होतें आणि त्या वेळीं 'तुम्ही एखादा कारखाना कां काढीत नाहीं' असें ऐकून घ्यावें लागलें होतें, त्याच सरकारनें इ. स. १९०४ सालीं प्रफुल्लचंद्रांस विनंति केली कीं, 'बंगाल सरकारची अशी इच्छा आहे कीं, तुम्ही युरोपांतील रासायनिक प्रयोगशाळा पाहण्यास जावें आणि तिकडून आल्यावर सरकारला आपला अहवाल सादर करावा. सरकार या कामीं येणारा खर्च आपणांस देऊं इच्छितें.'

प्रफुल्लचंद्र युरोपला गेले. त्यांनीं तिकडील अनेक प्रयोगशाळा पाहिल्या आणि परत आल्यावर सरकारला अत्यंत महत्त्वाचा असा अहवाल देऊन त्यांत सरकारनें रसायनशास्त्राच्या प्रगतीसाठीं काय केलें पाहिजे, हेंहि नमूद करून ठेविलें. सरकारला प्रफुल्लचंद्रांच्या या अहवालाचा अत्यंत उपयोग झाला, असें सांगतात. इ. स. १९१३ सालीं ते सरकारी कॉलेजांतील नोकरींतून मुक्त झाले व राजकीय, सामाजिक कार्य करण्यास अगदीं पूर्ण मोकळे झाले. स्वराज्यप्राप्तीसाठीं ते आपला अधिकांत अधिक वेळ देऊं लागले.


## नवे विचार

स्वत: ते खादी वापरीतच; पण आपल्या परिचित मंडळींनाहि खादी वापरण्याचा आग्रह धरीत. ते म्हणत,

"खादी वापरल्यानें भारताचें भाग्य उदयाला येईल. कल्याण होईल. भारत सुखी होईल. एक कोटि शेतकऱ्यांनीं दररोज दोन तास प्रमाणें जरी नुसतें सूत कांतलें तरी बंगालचें उत्पन्न दरवर्षाला अजमासें बारातेरा कोटींनीं वाढेल. अर्धपोटीं राहणारा शेतकरी पोटभर खाईल. ते खेड्यापाड्यांत जेव्हां जेव्हां जात तेव्हां तेव्हां तेथें ते लोकांना सांगत, तुमच्या ठिकाणीं भीमाचें बळ आहे. या बळाचा उपयोग तुम्हीं योग्य ठिकाणीं केला पाहिजे. एकजुटीनें सहकार्यानें छोटे छोटे कारखाने काढले पाहिजेत. घर म्हणजे छोटा कारखानाच! असें झालें पाहिजे. स्वराज्य – स्वातंत्र्य मिळविण्याचें हें एक साधन आहे. जी व्यक्ति, जो देश, जें राष्ट्र स्वतःच्या गरजा स्वतःच भागविण्याचा प्रयत्न करतें, त्याला स्वातंत्र्य-प्राप्ति होते, तेंच आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकतें. ते आणखीहि सांगत असत. भारतांत जातिभेद फार, पंथभेद फार, मतभेद फार. तसें असतां कामा नये. परंपरेनें चालत आलेले हे भेद आपण शक्यतों कमी केले पाहिजेत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं साऱ्यांनीं एक झालें पाहिजे. त्यासाठीं साऱ्यांनीं खांद्याला खांदा लावून उभें राहिलें पाहिजे. साऱ्यांनीं एकच आवाज काढला पाहिजे, आणि स्वातंत्र्याची मागणी केली पाहिजे. प्रफुल्लचंद्र जरी कोणत्याहि एका विशिष्ट राजकीय पंथांतील नव्हते, तरी पण लो. टिळक, महात्मा गांधी यांचें स्वातंत्र्यपाप्तीचे प्रयत्न पाहून




आचार्य प्रफुल्लचंद्र स्वतांच्या ‘ बंगाल केमिकल ॲण्ड फार्मास्युटिक वर्क्स, लि.’ या कारखान्यापुढें उभे आहेत. पान ५३



स्वतांचा ‘ बंगाल केमिकल ॲण्ड फार्मास्युटिक वर्क्स, लि ’ हा कारखाना सार्वजनिक आहे, असें प्रफुल्लचंद्र जाहीर करीत आहेत. पान ५३



आचार्य प्रफुल्लचंद्रांच्या ' हिंदी रसायन शास्त्राचा
इतिहास ' या नव्या महान ग्रंथाची जगभर
एकमुखी चालूं असलेली स्तुति वर्तमान-
पत्रांत वाचून कौतुक करीत असलेले
पाश्चिमात्य शास्त्रज्ञ. पान ५७



आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय चरख्यावर सूत
काढीत आहेत. पान ६३

आपणहि राजकारणांत पडावें, असें त्यांस केव्हां केव्हां वाटत असे. त्यांनीं आपलीं वर लिहिलेल्या मतांशिवाय इतर कोणत्याहि प्रकारचीं राजकीय मतें प्रतिपादिलीं नाहींत. त्यांचें बहुतेक आयुष्य 'गुरु' म्हणून गेलेलें, त्यामुळें त्यांचें अधिकांत अधिक लक्ष शिक्षणाकडे व शास्त्रीय ज्ञानाकडेच – प्रयोग करण्याकडेच असे. त्यांना सगळे लोक आचार्य प्रफुल्लचंद्र रे किंवा नुसतेच 'आचार्य रे' म्हणून ओळखीत. त्यांनीं आपलें अधिकांत अधिक आयुष्य शास्त्रीय संशोधनांतच घालविलें. त्यांना जर कुणीं विचारलें, 'आचार्य, तुमच्या आयुष्यांतील अति महत्त्वाचा आणि खऱ्या कार्याचा काळ कोणता?' तर ते सांगत, 'माझ्या वयाला साठ वर्षें पुरीं झाल्यानंतरचा.'

## समाजसेवा आणि चरखा

म्हणजे! तुम्हीं जगाला आश्चर्यचकित करून सोडणारा शोध लाविला, तुमची कीर्ति शिगेला पोंचली, तुमच्या वयाच्या पस्तीसाव्या वर्षीं! हा महत्त्वाचा काळ सोडून तुम्ही तर म्हणतां साठ वर्षें पुरीं झाल्यानंतरचा माझा काळ अति महत्त्वाचा! हें कसें! त्यावर आचार्य प्रफुल्लचंद्र म्हणत, 'माझ्या वयाच्या साठ वर्षांनंतरच मला अधिक उत्साह वाटूं लागला.'

आणि प्रफुल्लचंद्रांचें हें सांगणें अगदीं योग्य होतें. त्यांनीं समाजसेवा आपल्या वयाच्या साठ

वर्षानंतरच अधिक केली. सन १९२२ सालीं उत्तर बंगालमध्यें जो दुष्काळ पडला तेव्हां प्रफुल्लचंद्रांनीं फार मेहनत घेतली. त्या वेळीं या दुष्काळांत प्रफुल्लचंद्रांना असें आढळून आलें कीं, स्वातंत्र्य-प्राप्तीशिवाय दुष्काळांतून कायमचें मुक्त होतां येणार नाहीं. आज जर आपणांला स्वातंत्र्य असतें-आपला भारत जर स्वतंत्र असता तर शेतकऱ्यांना दुष्काळाला तोंड देण्याची शक्ति आली असती. अवर्षणामुळें वा अति-वृष्टीमुळें दुष्काळ पडो. शेतकऱ्याला जर शेतीबरोबरच कांहीं जोडधंदा असता तर आजच्या या दुष्काळांत शेतकरी जसा अगदींच अगतिक झाला आहे, तसा तो झाला नसता. स्वतंत्र भारत शेतकऱ्यांना खासच जोडधंदा करण्यास उत्तेजन देता. प्रफुल्लचंद्रांस याच वेळीं महात्माजींचा चरखा दिसूं लागला. चरख्याचें सामर्थ्य दिसूं लागलें. महात्मा गांधींनीं याच वेळीं चरख्याचें महत्त्व जनतेला पटविलें होतें. महात्माजी आपल्या संदेशांत सांगत, " चरखा हा महामंत्र आहे. श्रीकृष्णाचें सुदर्शन चक्र आहे. चरखा कामधेनु आहे. कल्पवृक्ष आहे. खेड्यापाड्यांत घरोघर चरखा फिरला पाहिजे. सूत निघालें पाहिजे. शेतकऱ्यांना हा 'जोडधंदा' संसार चालविण्यास नक्कीच मदत करील ?" प्रफुल्लचंद्रहि आपल्या व्याख्यानांतून सांगूं लागले, देशाच्या संपत्तींत सहज भर घालतां येण्यासाठीं चरखा हें एक उपयुक्त साधन आहे. सन १९२४ मध्यें खादी-प्रदर्शन

झालें, या प्रदर्शनांत आचार्यांचें व्याख्यान झालें. त्यांत ते म्हणाले, "चरख्याचा उद्योग जर खेड्यांनीं स्वीकारला तर किती तरी उद्योग त्यांच्याभोंवतीं उभे राहतील. रंगकाम, विणकाम तेथें होईल. चरखा ही ग्रामोद्योगाची किल्ली आहे. तो खेड्यांत नवजीवन, नवचैतन्य उत्पन्न करील. आजच्या अर्धपोटीं शेतकऱ्यांच्या पोटांत चरख्यामुळें अन्नाचा एक घास अधिक जाईल."

प्रफुल्लचंद्र कोणत्याहि राजकीय पक्षांत सामील झाले नाहींत, हें जरी खरें होतें, तरी पण देशाच्या हिताच्या, विधायक अशा कोणत्याहि कार्यांत ते तळमळीनें भाग घेत. लो. टिळकांचें, महात्मा गांधींचें राजकारण आणि देशांत होणारीं आंदोलनें ते पाहत होते. राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास ते न चुकतां हजर राहत होते आणि आपल्या हातून जितकें कांहीं विधायक कार्य होण्यासारखें होतें, तितकें ते करीत होते. प्रफुल्लचंद्र शास्त्रज्ञ होते. संशोधक होते. त्यांना स्वतःला काय कमी होतें; पण त्यांनीं स्वतःचा संसार केलाच नाहीं. त्यांना देशांतील गरिबांच्या संसाराची काळजी लागलेली होती. कधीं कधीं ते एकटेच गरिबांच्या उन्नतीबद्दल विचार करीत तासन् तास बसत. एकदां ते असेच विचार करीत बसले असतां, कलकत्त्यांतील एक देशभक्त त्यांस भेटावयास आले. त्यांनीं प्रफुल्लचंद्र विचारांत मग्न असलेले पाहून विचारलें, 'आचार्य,

कोणत्या गोष्टीचा विचार करतां? आणखी एखादा नवा प्रयोग करून नवा शोध लावावयाचा आहे कीं काय?'

'होय. पण आपल्या मनांत आला आहे तसला शोध नव्हे.'

'मग?'

'आज खेड्यांतील जनतेला शेतीचा हंगाम संपल्या-नंतर सहा महिने रिकामें राहावें लागतें, त्यांना कोणता धंदा देतां येईल, याचा मी विचार करतों आहें. हासुद्धां एक नवा शोधच लावण्यासारखा आहे; नाहीं का?'

'होय. आपण हा नवा शोध लावणार ना?'

'होय! पण माझ्या हातून हें काम आतां कसें पुरें होईल?'

## नव्या पिढीचें कार्य

'मी प्रयोगाची दिशा दाखवीन. प्रयोग करणें आणि तो सर्वांना समजावून देणें नव्या पिढीचें काम. नव्या पिढीलाच तो उपयोगी पडणारा आहे; आणि ह्या प्रयोगाची दिशा सन १९२६ मध्यें म्हैसूर विद्यापीठाच्या पदवीदान-प्रसंगीं मीं जें अध्यक्षीय भाषण केलें, त्या भाषणांत स्पष्ट करून ठेविली आहे. मीं त्या वेळीं असें सांगितलें कीं, आजची आपली शिक्षण पद्धति अशी आहे कीं, तीमुळें आपण व्यवहारशून्य बनतों.

विद्यापीठें म्हणजे पदवीधर तयार करण्याचे कारखाने. या कारखान्यांतून पदवीधर बाहेर पडले, कीं ते आपापला चरितार्थ चालवितात. देशाच्या प्रगतीला त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. विद्यार्थ्यांनीं रसायन-शास्त्राचा अभ्यास करावा, आणि एखाद्या धंद्याचें ज्ञान मिळवून खेड्यांत जावें. तेथील लोकांना आपणांला माहीत असलेल्या धंद्याचें ज्ञान द्यावें. जोडधंदा करण्यास प्रोत्साहन द्यावें. उद्योगधंद्याची वाढ करण्याचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवावें.'

आचार्य इतकें बोलून जरा थांबले आणि पुन्हा म्हणाले, "याला कांहीं फार काळ जाणार नाहीं, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हें सारें होईल."

प्रफुल्लचंद्र श्रेष्ठ ऋषि होते. आचार्य होते. त्यांना भारताचें भविष्य समजत होतें. त्यांना भारताचा उज्वल काल दिसत होता. त्यांना भारताच्या कर्तृत्व-शक्तीची जाणीव झाली होती. म्हणूनच ते म्हणाले, भारताला वैभव प्राप्त होण्यास फारसा काळ लागणार नाहीं. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तो लवकरच येईल.

प्रफुल्लचंद्र शास्त्रज्ञ होते. शास्त्रज्ञ म्हटला कीं, त्याचें जग वेगळें. तो आपल्या संशोधनांतच गर्क असावयाचा, सर्व जगाला विसरून मनाची शक्ति दृढपणें स्थिर करावयाचा. सर्व शक्ति एकवटून काम करावयाचा, शास्त्रज्ञ पण आचार्य प्रफुल्लचंद्र हे इतर शास्त्रज्ञांपेक्षां कांहीं वेगळेच होते. त्यांचें आपल्या संशोधन कार्याइतकेंच आपल्या देशावरहि प्रेम होतें. त्यांना वाटे,

**" मना दैन्य दौर्बल्य हें पाहवेना**
**मना हिंदभूची व्यथा साहवेना**

भरे घोर अज्ञान हें दुर्विकारी
मना राष्ट्रशिक्षाजनें त्या निवारी
महा मंगला पावना पुण्य भूमि
तिचे राष्ट्रमाते, तुझे बाळ आम्ही
तुझें नांव या सार्थ लोकीं करावें
स्वयें उद्धरोनी जना उद्धरावें"

आणि म्हणूनच त्यांनीं सामाजिक कार्यांतहि अतिशय तळमळीनें भाग घेतला.

भारतांतील जनता अज्ञान, जातीयता, त्याज्य अशा सामाजिक रूढी यांच्या भोवऱ्यांत सांपडून खोल खोल दैन्याच्या डोहांत बुडत चालली आहे.

— आणि हें सगळें पार नाहीसें व्हावें आणि आपल्या कोटच्यवधि देशबांधवांचें हित साधावें यासाठीं आचार्यांनीं शास्त्र संशोधनाइतकेंच किंबहुना त्यापेक्षां कांकणभर अधिक महत्त्व सामाजिक कार्यासाठीं दिलें.

सन १९३२च्या १८ ऑगस्टपासून जेव्हां हरिजन चळवळ महात्मा गांधींनीं सुरू केली तेव्हां आचार्यांनींहि या चळवळींत मनाच्या तळमळीनें भाग घेतला. विहिरी, देवळें हरिजनांस खुलीं व्हावींत, यासाठीं त्यांनीं बंगालभर दौरे काढले. महात्मा गांधींनीं ८ फेब्रुवारी १९३३ रोजीं हरिजन चळवळीसाठीं एकवीस दिवसांचा उपवास सुरू केला, त्याला आपली संमति म्हणून आपणहि तीन दिवसांचा उपवास केला आणि हरिजन चळवळींत भाग घेऊन बरेंच मोठें कार्य केलें.

हरिजन चळवळींत त्यांनीं जितक्या आस्थेनें भाग घेतला तितक्याच आस्थेनें पुनर्विवाहाच्या चळवळींतहि भाग घेतला. बंगालमध्यें इतर प्रांतांपेक्षां बालविधवांचें

प्रमाण अधिक. याचें कारण अगदीं लहान वयांत मुलींचीं लग्नें करण्याची प्रवृत्ति बंगालमध्यें अधिक! तरीपण पुनर्विवाहाच्या चळवळीस आरंभ बंगालमध्येंच झाला, असें म्हणतात. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं या कामीं फारच मोठी कामगिरी केलेली आहे: त्यांनीं पुनर्विवाह–विधवा–विवाह कायदेशीर समजला जावा म्हणून सरकारनें कायदा करावा अशी मागणी करणारा पंचवीस हजार बंगाली जनतेच्या सह्यांचा अर्ज सरकारकडे पाठविला होता. शिवाय विधवा–विवाहाच्या कायदेशीरपणाविषयीं व उपयुक्तते-विषयीं सामाजिक व धार्मिक मतांचा विचार करून दोन अति उत्कृष्ट ग्रंथ लिहिले होते.

हे दोनहि ग्रंथ आचार्य प्रफुल्लचंद्रांनीं वाचून काढले आपणहि लेख लिहिले, व्याख्यानें दिलीं आणि राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांची परंपरा पुढें चालविली.

—आचार्य प्रफुल्लचंद्र यांनीं आपलें सारें आयुष्य देशाच्या हितासाठीं घालवून इतरांस उदाहरण घालून दिलें आणि, म्हणूनच ते म्हणाले, भारताला वैभव प्राप्त होण्यास फारसा काळ लागणार नाहीं!

## श्रेष्ठ ऋषि

आचार्यांची वाणी आज बत्तीस वर्षांनीं खरी होऊं पाहात आहे. पण आचार्य मात्र तें पाहण्यास नाहींत. ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या अगोदरच १९४४ च्या १६ जूनला आपल्यांतून निघून गेले–कालवश झाले. आणि राम, कृष्ण, जनक, ख्रिस्त, महंमद यांच्या रांगेंत जाऊन बसले. कारण आचार्य प्रफुल्लचंद्र हे कर्मयोगी होते. त्यांचा कर्मयोग निष्काम होता. त्यांना लाखों

रुपये मिळवितां आले असते; पण त्यांना तशी इच्छा नव्हती. त्यांची एकच इच्छा होती. भारत स्वतंत्र व्हावा. गरीब सुखी व्हावा. शेतकरी आनंदानें जगावा. आचार्य प्रफुल्लचंद्रांनीं त्यासाठीं खूप श्रम घेतले. खूप देशसेवा अगदीं निःस्वार्थीपणानें केली. त्यांनीं अतिशय काटकसरीनें वागून उरलेला पैसा गरीब विद्यार्थ्यांस देऊन त्यांना मदत केली. विद्यार्थ्यांच्या मार्गांत केवळ पैशामुळें जर अडथळे येत असतील, तर ते दूर करण्यास आचार्य नेहमींच तयार असत. त्यांचे विद्यार्थीहि त्यांचेवर अतिशय प्रेम करीत. 'आचार्य प्रफुल्लचंद्रांचे विद्यार्थी' असें म्हणविण्यास विद्यार्थ्यांस अभिमान वाटे. आचार्यहि आपल्या विद्यार्थ्यांवर अतिशय प्रेम करीत, कळकळ दाखवीत, संशोधनाची गोडी लावीत. ते कोणतेहि प्रयोग स्वतः एकटे करीत नसत. एक तरी विद्यार्थी आपल्या जोडीला ते घेत असत. सन १८८९ पासून १९१३ पर्यंत म्हणजे चोवीस वर्षें ते प्रेसिडेन्सी कॉलेजांत होते. या काळांत कलकत्त्याचें प्रेसिडेन्सी कॉलेज म्हणजे संशोधकांचें भारतीय विद्यापीठच बनलें होतें. आचार्यांच्या हाताखालीं काम करण्यास मिळावें, म्हणून भारताच्या सर्व भागांतून विद्यार्थी तेथें येत असत, आणि जगांतील सारीं विद्यापीठें व सारें रसायन शास्त्राचे संशोधक 'आपल्याकडे कोणता नवा प्रयोग चालला आहे' अशी वारंवार विचारणा करीत असत. प्रफुल्लचंद्रांनीं जगांतील सर्वच शास्त्रज्ञांस आपल्या शोधामुळें आश्चर्याचा धक्का दिला होता, त्याचा हा परिणाम !

प्रफुल्लचंद्र हे शास्त्रज्ञांचे जवळजवळ गुरुच होते. त्यांचें आचार्यपणाच्या कामगिरीचें महत्त्व ओळखून

આ૦૮૫૪૬-૭૫
૯૮૮ ૬૧
૨૯|૩|૫૦

सरकारनें त्यांस सन १९११ सालीं सी. आय्. ई. हा किताब व सन १९१९ सालीं 'सर' हा सर्वश्रेष्ठ असा बहुमान दिला. पण त्यामुळें या महान् बुद्धीच्या आचार्याला त्यांचा विशेष आनंद झाला असें नाहीं. आपल्या विद्यार्थ्यांनीं अत्यंत प्रेमानें दिलेल्या 'आचार्य' पदवीमुळेंच त्यांना विशेष आनंद झाला; आणि तसें पाहिलें तर त्यांना पदव्या आणि मानसन्मानापासून आनंद होतच नव्हता; कारण त्यांचें हृदय विशाल होतें. 'विशाल हृदयाला क्षुल्लक गोष्टींपासून आनंद, दुःख कसें होणार! प्रफुल्लचंद्रांनीं महान् कामगिरी केली ती लोकांच्या दृष्टीनें — स्वतःच्या दृष्टीनें नव्हे. त्यांना आपल्या शोधाचा, ज्ञानाचा गर्व नव्हता. थोर माणसें अशींच असतात. मंडनमिश्र आणि आद्य शंकराचार्य यांचा वाद झाला. वादांत शंकराचार्य विजयी झाले. ठरल्याप्रमाणें मंडनमिश्रांनीं दीक्षा घ्यावयाचें ठरविलें. नदीवर ते स्नानास गेले. रस्त्यानें जातांना मंडनमिश्र शंकराचार्यांच्या ज्ञानाची स्तुति करीत होते. नदीवर गेल्यावर सहज ते शंकराचार्यांस म्हणाले, 'महाराज, आपण किती तरी ज्ञानी आहांत!'

तें ऐकून शंकराचार्यांनीं नदीच्या पाण्यांत आपल्या हातांतील दंड बुडवून वर काढला. दंडाला थोडेंसेंच पाणी चिकटलें होतें. त्याकडे पाहून आचार्य म्हणाले, 'नदींतील पाणी ह्या दंडाला जितकें लागलें आहे, तितकेंच ज्ञान, ज्ञानसागरांतून मला झालें आहे.' किती ही नम्रता! प्रफुल्लचंद्रांनाहि आपल्या ज्ञानाचा गर्व नव्हता. तेहि सदा नम्रता बाळगीत. त्यांची राहणी अत्यंत साधी होती, पण ती नियमबद्ध होती. त्यांचा

दिनक्रम अगदीं ठरलेला होता. ते पहाटे उठत. आणि प्रातर्विधि आटोपून लगेच अभ्यासास बसत. सुमारें नऊ वाजेपर्यंत अभ्यास करणें, टिपणें तयार करणें, हें काम ते करीत. नंतर ते थोडें फिरून येत व वर्तमानपत्रें पाहात आणि मग अर्धा तास सूत कांतीत बसत. तोंपर्यंत त्यांच्या भेटीस अनेक लोक येऊन बसलेले असत. बारा वाजेपर्यंत त्या लोकांशीं बोलत. त्यांना सल्लामसलत देत. त्यांच्याशीं विचारविनिमय करीत. मग जेवणखाण उरकीत. थोडी विश्रांति घेत आणि प्रयोग-शाळेंत जात किंवा अभ्यास करीत. अगदीं शेवटपर्यंत त्यांच्या ह्या कार्यक्रमांत बदल झाला नाहीं. ते म्हणत, "योग्य वेळीं जर योग्य गोष्ट मनुष्य करील, तर त्याला तो करतो, त्याच्या दसपट काम करतां येईल." आणखीहि ते म्हणत, "दिवस उगवतांच मी आज काय सत्कृत्य करूं शकेंन, असा प्रश्न स्वतःला विचारावा, आणि संध्याकाळीं मीं आज कोणतें सत्कृत्य केलें, याचा विचार करावा.' ते स्वतः तसे वागत होते. त्यांनीं सन १९३२ सालीं आपलें आत्मवृत्त प्रसिद्ध केलें. तें वाचलें असतां आपणांला यशस्वी जीवनाचा मार्ग सांपडतो, आणि स्फूर्ति मिळते.

आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय यांनीं आपलें जीवन भारताची कीर्ति व वैभव वाढविण्यांत घालविलें. त्यांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून भारतीय तरुणांनीं आपलें जीवन घालविलें तर भारताच्या वैभवांत भर पडेल. भारत 'सुजलाम्, सुफलाम्' होईल. आणि भारत वैभवाच्या अत्युच्च शिखरावर पोहोंचेल.

• • •

# परिशिष्ट

## आचार्य प्रफुल्लचंद्रांच्या आयुष्यांतील ठळक गोष्टींचे सन

१८६१ प्रफुल्लचंद्रांचा जन्म.

१८७० कलकत्ता हेअर स्कूलमध्यें प्रवेश.

१८७६ आल्बर्ट स्कूलमध्यें दाखल.

१८७९ प्रवेश-परीक्षा पास.

१८८२ गिल्क्राइस्ट शिष्यवृत्ति मिळाली. युरोपांत शिक्षणाकरितां गमन.

१८८८ डी. एस्सी. पदवी मिळविली.

१८८९ कलकत्यास प्रेसिडेन्सी कॉलेजांत नोकरी.

१८९२ खासगी रसायन-शास्त्राचा कारखाना.

१८९६ 'मर्क्युरस् नाइट्रेट'चा शोध.

१९१३ सरकारी कॉलेजांतून निवृत्त.

१९१८ मद्रास विश्वविद्यालयाकडून रसायन-शास्त्रावर व्याख्यानें देण्यास आमंत्रण.

१९२० इंडियन सायन्स कॉन्ग्रेसचे अध्यक्ष.

१९२२ उत्तर बंगालमधील दुष्काळांस मदत.

१९३२ आत्मचरित्र प्रसिद्ध केलें.

१९४४ मृत्यु १७ जून १९४४.

# आचार्य प्रफुल्लचंद्रांचे कांहीं विचार

- स्वराज्य पहिलें. बाकीच्या गोष्टी मागाहून.
- स्वराज्याच्या प्राप्तीसाठीं हिंदु – स्पृश्य व अस्पृश्य एक झाले पाहिजेत. त्यांच्यांतील जातिभेद नाहींसा झाला पाहिजे.
- प्रत्येकाचें शिक्षण आपल्या स्वतःच्या भाषेंत झालें पाहिजे.
- वेळेचा सदुपयोग न केल्यास आयुष्य फुकट जातें. रिकाम्या वेळींहि माणसानें कांहींना कांहीं कामगिरी करावी, नाहीं तर मनुष्य आळशी बनतो.
- तरुणांनीं देशोद्धाराचीं कामें अंगावर घ्यावींत, शीलवान् व्हावें, कर्तव्यनिष्ठ असावें. आपली सत्यनिष्ठा कधींहि डळमळूं देऊं नये. आपला मार्ग सत्य आहे, अशी खात्री पटली कीं, तोच मार्ग आचरावा.
- लोक काय म्हणतात, यास भलतें महत्त्व देणें, हा अविचार आहे.
- गुणांचा अधिकाधिक संचय करावा व ते गुण स्वतःच्या [illegible]

- जीवनांत जो फक्त एकच गोष्ट मिळवावयाचा प्रयत्न करतो, एकाच गोष्टींत आपलें जीवनसर्वस्व खर्च करतो, त्यालाच ती गोष्ट मिळण्याचा संभव असतो.
- ज्ञान मिळवावयाचें असलें, तर प्रणिपात कर. नम्र होऊन सेवा कर. शिष्याचें हृदय नम्र असलें पाहिजे. नम्रता म्हणजे जीवन. अहंकार म्हणजे मृत्यु.
- पैसा मिळविण्य … जगाच्या … ऱ्यांसमोर ज्ञानराशींत न … असलें पाहिजे.

IRBK-0106236